cmyk


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ०३ | अंक-३५१ | बुधवार दि.०३ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


**संपादकीय**

## सरकारचा कर दहशतवाद चिंतनीय...

अंतर्गत दहशतवाद कसा असतो याची झलक आता पहावयास मिळत आहे. घोषित लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने हा वाद लक्षात येतो आहे. विरोधी पक्षांना, विशेषत: काँग्रेस पक्षाला प्रकर्षाने त्याची अनुभूती येत असेल. २०१८-१९ वर्षातील प्राप्तीकर चुकविल्या प्रकरणी काँग्रेसची बँक खाती गोठवणाऱ्या प्राप्तीकर विभागाने २९ मार्च रोजी या पक्षाला १८२३.०८ कोटी रुपयांचा कर आणि दंड भरण्यासाठी नोटीस बजावली. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची प्रक्रिया सुरू असतानाच करण्यात येत असलेल्या या कारवाईला काँग्रेसने 'भाजपचा कर-दहशतवाद' असे संबोधले आणि भाजपने ४६०० कोटींहून अधिकचा कर बुडवल्याचा आरोपही केला. बँकेतील खाती गोठवण्यात आल्यामुळे आर्थिक चणचण भासणाऱ्या काँग्रेससाठी प्राप्तीकर विभागाची नोटीस धक्कादायक ठरली.

## आप खासदार संजय सिंह यांना जामीन मंजूर

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांना अखेर सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने त्यांना हा जामीन मंजूर केला. दिल्ली दारू धोरणाशी संबंधित घोटाळ्याप्रकरणी ते ६ महिने ते तुरुंगात होते. दरम्यान, न्यायालयाच्या निर्णयानुसार संजय सिंह यांना राजकीय कार्यातही सहभागी होता येणार आहे. त्यामुळे लोकसभेच्या निवडणुकांमध्ये 'आप'ला मोठा दिलासा मिळाला आहे.

# मोदी सरकारने खरीपातला दुसरा हप्ता रोखला रब्बीच्या कापण्या सुरू झाल्या तरी पैसे मिळेना!

**पुणे । प्रतिनिधी**

खरीप हंगाम गेला रब्बी हंगामाच्या कापण्या सुरू झाल्या तरी केंद्र सरकारकडून दोन हजार कोटी रुपयांचा दुसरा हप्ता विमा कंपन्यांना देण्यात आला नाही. यामुळे शेतकरी विम्याच्या दुसऱ्या हप्त्याच्या प्रतिक्षेत आहेत. प्रधानमंत्री खरीप पीकविमा योजनेतून राज्यातील २४ जिल्ह्यांमधील ५० लाख ९४ हजार ४६७ शेतकऱ्यांना २ हजार २०६ कोटी रुपयांची २५ टक्के अग्रिम जाहीर करण्यात आली. उर्वरित ७५ टक्के नुकसानभरपाई देण्यासाठी कृषी विभागाच्या पीक कापणी प्रयोग




अहवालाचा आधार घेतला जातो. या पीककापणी अहवालातून संबंधित महसूल मंडळाचे सरासरी उत्पादन ठरविण्यात येते. नुकसानभरपाई देताना सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनाच्या कमी असल्यास पूर्वी दिलेली पंचवीस टक्के अग्रिम वजा करून उर्वरित रक्कम विमा कंपन्यांकडून दिली जाते.

### राज्याने दिला केंद्राचा हप्ता राहिला

दरम्यान, राज्य सरकारने पहिला हप्ता २ हजार ३०० कोटी रुपये, दुसरा हप्ता म्हणून २ हजार कोटी रुपये यापूर्वीच विमा कंपन्यांना दिला आहे. परंतु केंद्र सरकारचा २ हजार कोटी रुपयांचा दुसरा हप्ता अद्याप मिळू शकलेला नाही.

मागच्या वर्षी अल निनोच्या स्थितीमुळे राज्यात अनेक ठिकाणी अत्यंत कमी पावसाची नोंद झाली. दरम्यान कमी पावसाने खरीप हंगामावार मोठा परिणाम झाला. यावर राज्य आणि केंद्र सरकारकडून मदतीची घोषणा करण्यात आली. उत्पादनात घट होण्याच्या दृष्टीने पंतप्रधान खरीप पीकविमा योजनेतून शेतकऱ्यांना २५ टक्के रक्कम अग्रिम म्हणून देण्यात आली. उर्वरित रकमेबाबत पीककापणी अहवालाचा आधार घेऊन विमा कंपन्या निर्णय घेणार आहेत. कृषी विभागाने तयार केलेल्या पीक कापणी अहवालाचे आकडे विमा कंपन्यांच्या पीकविमा पोर्टलवर ◀◀ पान २ वर

## समन्यायी पाणी वाटप प्रकरणी अखेर न्याय मिळाला -अमरसिंह पंडित

**नगर - नाशिककरांच्या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या**

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायदा अस्तित्वात आणून शासनाने गोदावरी खोऱ्यातील समन्यायी पाणी वाटपाचे धोरण अंमलात आणले. गोदावरीच्या पाण्यावर नगर आणि नाशिककरांनी हक्क सांगत या धोरणाला सातत्याने विरोध केला. अनेक वर्षांपासून हा विषय न्यायालयीन पातळीवर प्रलंबित होता. अखेर सर्वोच्च न्यायालयाने या संबंधीच्या सर्व याचिका खारीज करून समन्यायी पाणी वाटपाच्या धोरणावर शिक्कामोर्तब केला आहे. आता मराठवाड्याच्या हक्काचे पाणी कोणीही रोखू शकणार नाही. समन्यायी पाणी वाटप प्रकरणी अखेर न्याय मिळाल्याची भावना जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केली.



शारदा प्रतिष्ठानच्यावतीने त्यांनी सर्वोच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल केली होती. ॲड. दिलीपराव तौर यांनी प्रतिष्ठानच्या वतीने न्यायालयात बाजू मांडली. अमरसिंह पंडित यांनी मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी सातत्याने वेगवेगळ्या पातळीवर लढा दिला.

गोदावरी खोऱ्यात ठरवून दिलेल्या पाणी वापरापेक्षा जायकवाडी प्रकल्पाच्या उर्ध्व भागात पाणी वापराची बेकायदेशीर असंख्य धरणे बांधल्यामुळे जायकवाडी जलाशयात निर्धारीत पाणीसाठा उपलब्ध होत नाही. या कारणामुळे सातत्याने मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्याचा प्रश्न शासन दरबारी ◀◀ पान २ वर

## धुळे एलसीबीचा पीआय लाच घेताना पकडला

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील सम्राट चौक शाहुनगर भागातील रहिवाशी तथा स्थानिक गुन्हे शाखा धुळेचे पो.नि.दत्तात्रय सखाराम शिंदे यांच्यासह अन्य तिघांना दीड लाख रूपयांची लाच स्विकारताना पकडण्यात आले. ही कारवाई लाच लुचपत प्रतिबंधक विभाग धुळे यांनी केली.

तक्रारदार यांचेवर प्रतिबंधक कारवाई न करण्यासाठी आलोसे क्रं.१ यांनी तक्रारदार यांच्याकडून २,००,०००/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारण्यास संमती दर्शवून सदरची रक्कम नितीन आनंदराव मोहने व अशोक साहेबराव पाटील यांना देण्यास सांगितले. सदर लाच रक्कमे बाबत तक्रारदार यांनी नितीन आनंदराव मोहने व अशोक साहेबराव पाटील यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी तडजोडीअंती १,५०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य करून पंचांसमक्ष वरील लाच रक्कम स्वीकारताना दत्तात्रय सखाराम शिंदे, पद- पोलीस निरीक्षक , स्थानिक गुन्हे शाखा, धुळे ( वर्ग- १) , रा. सम्राट चौक, शाहू कॉम्प्लेक्स, फ्लॅट नं. २, बीड २) नितीन आनंदराव मोहने, पद -पो हवा. ३३४, स्थानिक गुन्हे शाखा धुळे, ( वर्ग- ३), रा. प्लॉट नंबर ५८, गंदमाळी सोसायटी, देवपूर, धुळे.३) अशोक साहेबराव पाटील, वय ४५ वर्ष, पद- पो. हवा १६२९, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे. ( वर्ग- ३) रा .- प्लॉट नंबर २५, मधुमंदा सोसायटी, नकाने रोड, देवपूर, धुळे त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. ही कारवाई धुळे लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने धुळे येथे केली.

सदरील सापळा रूपाली खांडवी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे यांच्या नेतृत्वात पो.हवा.राजन कदम, , पो.ना. संतोष पावरा, पो. शि.रामदास बारेला, चालक पो. शि. बडगुजर यांनी श्रीमती शर्मिष्ठा घारगे-वालावलकर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि,नाशिक परीक्षेत्र, नाशिक,माधव रेड्डी अपर पोलिस अधिक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक,नरेंद्र पवार पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

# अखेर ठरलेच; ज्योती मेटे याच तुतारी हाती घेणार?


**महाविकास आघाडीत जाण्यावर सहमती होताच शिवसंग्रामचे मावळे बीडला परतले**

**बीड । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचा बीडचा उमेदवार कोण असेल याचे उत्तर आता मिळाले असून महाविकास आघाडीत जाण्याची सर्वांची तयारी झाल्यानंतर शिवसंग्रामचे मावळे बीडला परतले आहेत. उमेदवारीबाबत असलेला संभ्रम आता दुर झाला असून ज्योती मेटे याच बीड लोकसभा निवडणुकीच्या रणांगणात तुतारी हाती घेऊन उतरणार आहेत. त्यांच्या नावाची घोषणा बुधवार किंवा गुरुवारी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे लोकसभेची निवडणुक एकतर्फी नव्हे तर आता ठासून आणि घासून होणार असल्याचे दिसते.

गेल्या दोन महिन्यांपासून महाविकास आघाडीकडून बीड लोकसभेसाठी







### शरद पवारांची आज घेणार भेट

विदर्भ दौऱ्यावर असल्याने शरद पवार यांची ज्योती मेटे या मंगळवारी त्यांची भेट घेऊ शकल्या नाहीत. त्यामुळे ही भेट बुधवारी होण्याची दाट शक्यता असून यावेळी शरद पवार बीड लोकसभेसाठी ज्योती मेटे यांचे नाव जाहीर करु शकतात.

वेगवेगळ्या नावांवर चर्चा रंगू लागल्या आहेत. सध्या ज्योती मेटे यांचे नाव आघाडीवर असून शिवसंग्रामचे मावळे पंकजा मुंडे यांना टक्कर देण्यासाठी मुंबईत तळ ठोकून होते. ज्योती मेटे यांचे शिवसंग्रामचे जिल्ह्यातील सर्व मावळे सोमवारी मुंबईत होते. मेटे यांच्या बरोबर सर्वांची बैठक झाली. यावेळी महाविकास आघाडीचा घटक पक्ष म्हणून शिवसंग्रामने काम करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षाचे चिन्ह तुतारीवर बीड लोकसभा लढवण्याचे ठरले असून यापुर्वी शिवसंग्रामच्या माध्यमातून निवडणुक लढवण्याचा आग्रह ज्योती मेटे यांनी धरला होता. आता त्या बीड लोकसभा लढवण्यासाठी हाती तुतारी घेण्यास तयार आहेत. त्यामुळे बुधवार किंवा गुरुवारी त्यांच्या नावाची घोषणा शरद पवार करु शकतात, असे म्हटले जात आहे. तसे झाले तर बीडमध्ये एकतर्फी नव्हे तर ठासून आणि घासून निवडणुक होईल असे संकेत आहेत.

## राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. परंतु महायुती आणि महाविकास आघाडीत काही जागा वाटपांचा पेच अद्याप सुटलेला नाही. दरम्यान, सर्व पक्षांनी प्रचाराची तयारी सुरू केली आहे. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने आपल्या ४० स्टार प्रचारकांची यादी मंगळवारी (दि.२) जाहीर केली. या यादीत पक्षाचे प्रमुख शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, आमदार रोहित पवार यांचा समावेश आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाची लोकसभेसाठी पहिली यादी जाहीर झाली आहे. यामध्ये सुप्रिया सुळे यांच्यासह अमोल कोल्हे, निलेश लंके अशी आणखी काही नेत्यांची नावे या यादीत आहेत. महाविकास आघाडीतील ठाकरे गटाने १७ उमेदवारांची यादी आधीच जाहीर केली आहे. त्यापाठोपाठ राष्ट्रवादी शरद पवार गटाने काही नावांची घोषणा केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शरद पवार गटाच्या उमेदवारांच्या पहिल्या यादीच्या प्रतिक्षेत होता. यादी जाहीर झाल्यानंतर उमेदवारांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी आपआपल्या मतदारसंघात आनंदोत्सव साजरा केला आहे.

# महाराष्ट्रातील सव्वा कोटी कामगार निवडणूकीत झाले ॲक्टीव्ह

**मोदी सरकारचा पराभव करण्याचा संमेलनात ठेवला ठराव**




**मुंबई । प्रतिनिधी**

येत्या लोकसभा निवडणुकीत कामगार, शेतकरी एकूणच जनता विरोधी नरेंद्र मोदी सरकारचा पराभव करा, असा एकमुखी ठराव महाराष्ट्रातील सर्व कामगार संघटनानी केला आहे. मुंबईत राज्यातून आलेल्या कामगार प्रतिनिधींच्या राज्यव्यापी संमेलनात ' मोदी सरकारचा पराभव' करण्यासाठी कामगार कर्मचाऱ्यानी कंबर कसली आहे.

राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या परेल येथील महात्मा गांधी सभागृहात कामगार कर्मचारी संघटना संयुक्त ◀◀ पान २ वर

### काय आहे ठराव

सर्व कामगार संघटनानी मोदी सरकार आणि भांडवलदार हटाव असा ठराव मंजूर केला की, सत्तेवर असणारे केंद्र आणि राज्य सरकार हे सातत्याने कामगारांवर अन्याय करीत असून त्यांचे सर्व अधिकार काढून घेतले आहेत. मोदी सरकार मालक व भांडवलदाराचे हित जोपासत आहेत. भांडवलदारांच्या दबावापोटी कामगार संघटनांनी १३० वर्षांपासून लढून मिळवलेले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले घटनात्मक कायद्याच्या आधारित ४४ कामगार कायदे रद्द करून, त्या जागी नवे ४ काळे कायदे आणले, म्हणून मोदी सरकारला आपण हरवले पाहिजे. हे सरकार परत सत्तेवर आल्यास या देशातील कामगार चळवळ संपुष्टात येऊन कामगारांना वेठबिगारीचे जीवन वाट्याला येणार! भीतीही या ठरावात व्यक्त करण्यात आली.

## १० एप्रिलला नरेंद्र मोदींची रामटेकमध्ये पहिली सभा

**मुंबई । प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रातून प्रचाराचे रणशिंग फुंकणार आहेत. त्यांच्या प्रचाराचा झंझावात राज्यात दिसून येणार आहे. येत्या १० एप्रिलला पंतप्रधान नरेंद्र मोदी रामटेक येथे पहिली जाहीर सभा घेणार आहेत. त्यानंतर १४ एप्रिलला दीक्षाभूमी येथे दर्शन व चंद्रपूर येथे जाहीर सभा नियोजित आहे, अशी माहिती भाजपा आमदार प्रविण दरेकर यांनी दिली. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची ५ किंवा ६ एप्रिल रोजी विदर्भात सभा होणार आहे. राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि शीर्षस्थ नेत्यांच्या सभांचेही वेळापत्रक लवकच जाहीर होईल असेही त्यांनी सांगितले.



निवडणूक व्यवस्थापन समितीच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना दरेकर म्हणाले की, भाजपा हा पक्ष निवडणुकीच्या दृष्टीने अत्यंत नियोजनबद्ध, कालबद्ध आणि समयसूचक काम करणारा पक्ष आहे. पक्षाची निवडणूक व्यवस्थापन समिती ही निवडणुकीत अत्यंत महत्वाची भूमिका निभावत असते. आज महाराष्ट्राच्या ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०१ एप्रिल २०२३**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू : ४५.५० क्विंटल** | | |
| २,१५८ | ३,२२० | २,८५६ |
| **ज्वारी/हायब्रिड :२१६.०० क्विंटल** | | |
| १,८८१ | ३,३९० | २,५९५ |
| **मूग :०.५० क्विंटल** | | |
| ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| **तूर : १५.५० क्विंटल** | | |
| ८,००० | ९,६८६ | ८,९८९ |
| **उडीद : २.०० क्विंटल** | | |
| ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| **बाजरी: १०.०० क्विंटल** | | |
| २,५९० | २,७२१ | २,६५५ |
| **चिंचोका/लोकल: ४.०० क्विंटल** | | |
| १,९०० | १,९०० | १,९०० |
| **सोयाबीन: ५४.५० क्विंटल** | | |
| ४,४११ | ४,५२० | ४,४३७ |
| **हरभरा: ३.०० क्विंटल** | | |
| ५,३२५ | ५,५०० | ५,४१२ |

## द्वारकादास मंत्री बँकेत ८१ कोटीच्या ठेवी

**बीड । प्रतिनिधी**

द्वारकादास मंत्री ना. सह बँक ही ६२ वर्षाची जुनी बँक असुन मध्यंतरी बँकेवर प्रशासक आल्यानंतर पुन्हा संचालक मंडळाची निवडणूक झाली त्यानंतर बँकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास सुरुवात झाली व बँकेची आर्थिक परिस्थिती रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे झाल्यामुळे रिझर्व्ह बँकेने बँकेचे दैनंदिन व्यवहार पूर्ववत सुरू करण्यास परवानगी दिली. बँकेकडे आज फक्त ८० कोटीच्या ठेवी राहिल्या आहेत. तर बँकेकडे स्वत:कडे रोख व बँकेतील शिल्लक रु एक्क्याऐंशी कोटी आहेत. व बँकेचे एकुण कर्जे येणे बाकी पासष्ट कोटी एवढे आहे. अशी माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. आदित्य सुभाषचंद्रजी सारडा यांनी दिली.

बँकेवर प्रशासक आले त्यावेळी बँकेकडे जवळपास ३०० कोटी डिपॉझिट होते ते आता फक्त ८० कोटी राहिले आहे. प्रशासक आल्यामुळे ठेवीदारांनी मोठया प्रमाणात बँकेतून ठेवी काढून घेतल्या ◀◀ पान २ वर



**बँक खात्यात ११७ कोटी शिल्लक, ६५ कोटीचे कर्जे येणे, नफा एक कोटी ऐंशी लाख -डॉ. आदित्य सारडा**

# बाबा रामदेव, आचार्य बाळकृष्ण यांचा माफीनामा सुप्रीम कोर्टाने फेटाळला

**''कोरोनिल'' या पतंजलीच्या औषधाने कोरोना पूर्णपणे बरा होण्याचा केला होता दावा**

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

कोविड काळात ''कोरोनिल'' या पतंजलीच्या औषधीने कोरोना पूर्णपणे बरा होण्याच्या भ्रामक व खोट्या जाहिराती प्रसारित केल्याबद्दल पतंजली आयुर्वेद कंपनीचे संस्थापक योगगुरू बाबा रामदेव आणि प्रबंध संचालक आचार्य बाळकृष्ण या दोघांनाही सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी कडक शब्दात फटकारून त्यांचा माफीनामा फेटाळून लावला. याप्रकरणी नव्याने माफीनामा सादर करून पुढच्या सुनावणीत पुन्हा व्यक्तिशः हजर राहण्याचे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने दिले.

इंडियन मेडिकल असोसिएशनने (आयएमए) दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह यांच्या खंडपीठापुढे सुनावणी सुरु आहे. या सुनावणीदरम्यान बाबा रामदेव आणि



आचार्य बाळकृष्ण यांनी व्यक्तिशः उपस्थित राहून न्यायालयाची बिनशर्त माफी मागितली. भ्रामक व खोट्या जाहिराती प्रसारित करणे ताबडतोब थांबवा, असे २१ नोव्हेंबरच्या सुनावणीत स्पष्ट निर्देश देऊनही बाबा रामदेव यांनी दुसऱ्याच दिवशी पत्रकारपरिषद घेऊन आपल्या आयुर्वेद औषधींचा खोटा व भ्रामक प्रचार सुरु ठेवल्याबद्दल दोन्ही न्यायमूर्तींनी तीव्र नापसंती व्यक्त केली. याप्रकरणात निव्वळ माफी मागून तुम्ही न्यायालयाच्या आदेशाला सहजतेने घेऊ शकत नाही, अशा कडक शब्दांत फटकारून न्यायमूर्तींनी बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांचा माफीनामा ◀◀ पान २ वर

### केंद्र सरकारने का कारवाई केली नाही - सर्वोच्च न्यायालय

कोरोनावर ॲलोपॅथीमध्ये कुठलाही उपचार नाही, असा दावा बाबा रामदेव यांच्या पतंजलीने केल्यानंतरही केंद्रसरकारने कंपनीवर कारवाई का केली नाही? असा सवाल न्यायमूर्तींनी केला. त्यावर महाधिवक्ता तुषार मेहता यांनी या मुद्याची दखल घेऊन पतंजली कंपनीने मोठी चूक केल्याचे सांगितले. बाबा रामदेव यांनी झाल्या प्रकाराबद्दल माफी मागितली असून त्यांना शेवटची संधी दिली जावी, अशी विंनती बाबा रामदेव यांचे वकील बलबीरसिंग यांनी न्यायालयाला केली.

cmyk

अग्रलेख

# सरकारचा कर दहशतवाद चिंतनीय

अंतर्गत दहशतवाद कसा असतो याची झलक आता पहावयास मिळत आहे. घोषित लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने हा वाद लक्षात येतो आहे. विरोधी पक्षांना, विशेषत: काँग्रेस पक्षाला प्रकर्षाने त्याची अनुभूती येत असेल. २०१८-१९ वर्षातील प्राप्तीकर चुकविल्या प्रकरणी काँग्रेसची बँक खाती गोठवणाऱ्या प्राप्तीकर विभागाने २९ मार्च रोजी या पक्षाला १८२३.०८ कोटी रुपयांचा कर आणि दंड भरण्यासाठी नोटीस बजावली. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची प्रक्रिया सुरू असतानाच करण्यात येत असलेल्या या कारवाईला काँग्रेसने 'भाजपचा कर-दहशतवाद' असे संबोधले आणि भाजपने ४६०० कोटींहून अधिकचा कर बुडवल्याचा आरोपही केला. बँकेतील खाती गोठवण्यात आल्यामुळे आर्थिक चणचण भासणाऱ्या काँग्रेससाठी प्राप्तीकर विभागाची नोटीस धक्कादायक ठरली.

संकटे येण्यास प्रारंभ झाला की, ती एकामागून एक येतात असे म्हणतात. त्याचा प्रत्यय आता काँग्रेस पक्षाला येत आहे. प्राप्तीकर विभागाने काँग्रेसला आणखी एक कर थकबाकीची नोटीस बजावली आहे. त्यानुसार २०१४-१५ ते २०१६-१७ या मूल्यांकन वर्षांसाठी १,७४५ कोटी रुपये कर थकबाकी असल्याचे नोटिशीत म्हटले आहे. त्यामुळे आता काँग्रेसकडे प्राप्तीकर विभागाने एकूण ३,५६७ कोटी रुपयांच्या थकबाकीची मागणी केली आहे. प्राप्तीकर विभागाने राजकीय पक्षांना उपलब्ध असलेली कर सवलत समाप्त केली असून पक्षाच्या संपूर्ण निधी संकलनावर कर आकारला आहे. काँग्रेसच्या काही नेत्यांवर टाकलेल्या छाप्यांदरम्यान आढळलेल्या डायरींमध्ये नोंद असलेल्या तृतीय पक्षांकडून जमा झालेल्या पैशांवरही काँग्रेसला कर आकारण्यात आला आहे. त्याच तृतीय पक्षांनी भाजपला दिलेल्या पैशांवर कोणताही कर आकारलेला नसल्याचा आरोप काँग्रेस नेत्यांनी केला आहे. निवडणुकीच्या धामधुमीत काँग्रेसवर कारवाई करणाऱ्या प्राप्तीकर विभागाने भाजपच्या आर्थिक अनियमिततेच्या प्रकरणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप काँग्रेसचे खजिनदार अजय माकन यांनी केला आहे. भाजपने २०१७-१८ या वर्षासाठी दाखल केलेल्या परताव्यामध्ये देणग्यासंदर्भातील माहिती दडवली आहे. भाजपला या वर्षभरात ४२ कोटींची देणगी मिळाली होती. एकूण १२९७ देणगीदारांपैकी अनेकांच्या नावे-पत्त्यांची माहिती देण्यात आलेली नाही. हे नियमांचे सरळ सरळ उल्लंघन आहे. काँग्रेसच्या १४ लाखांच्या रोखीच्या व्यवहारांवर आक्षेप घेऊन प्राप्तीकर विभागाने १३५ कोटींचा दंड ठोठावला असेल तर भाजपवर प्राप्तीकर विभागाने मेहेरबानी का केली? हा अजय माकन यांचा सवाल रास्तच म्हटला पाहिजे. काँग्रेसला नामोहरम करण्यासाठीच प्राप्तीकर विभागाचा हत्यारासारखा वापर केला जात आहे, ही बाब कोणाच्याही लक्षात येऊ शकेल. ईडी, आयकर विभाग, सीबीआयसारख्या संस्थांचा गैरवापर करून लोकशाहीला कमकुवत करणे आणि संविधानाचे महत्त्व कमी करणे हा जणू काही भाजप सरकारचा अजेंडाच बनला आहे की काय, अशी शंका येऊ लागली आहे. निवडणूक आयोगाने निवडणुका पारदर्शक, सुसंस्कृत आणि कायदा-सुव्यवस्थेचे भान राखत पार पाडण्याची हमी दिली आहे. यासाठी राजकीय पक्षांनी उत्तम आचार ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गुन्हेगारी, पैशांचा अनैतिक वापर, अफवा, चुकीच्या माहितीचा प्रसार आणि आदर्श आचारसंहिता ही चार आव्हाने निवडणूक आयोगासमोर आहेत. १९ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान निवडणूक आयोगाच्या 'सी-व्हिजील' ॲपवर आचारसंहिता भंगाच्या ७९ हजारांहून अधिक तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत म्हणे. म्हणजे निवडणूक आयोगाला किती दक्ष राहून काम करावे लागेल ते लक्षात येते. देशात स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुका होण्यासाठी उमेदवार आणि पक्षांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करायलाच हवे. उमेदवाराकडून वारंवार आचारसंहितेचे उल्लंघन होत राहिल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्याची कारवाई करायला हवी. तसे झाल्यास आचारसंहितेचे उल्लंघन करण्याचे धाडस कोणी करणार नाही. राजकारणात कोणीच कोणाचा कायमचा शत्रू अथवा मित्र नसतो. सध्या सोयीचे राजकारण करणारा एक वेगळाच पक्ष राजकारणात जन्माला आला आहे. राजकारणात केवळ सत्तेसाठी धडपडणाऱ्या सर्व राजकीय पक्षांचे सदस्य 'सोयीचे राजकारण' या नव्या पक्षाचे कृतीशील सदस्य आहेत. बहुपक्षीय भारतीय लोकशाहीत जनमताचा आदर व्हायला हवा, जनहिताची धोरणे राबविली जावीत, अशी माफक अपेक्षा आहे.

# रील्स की मनोविकार ?

आज-काल सोशल मिडियाचा जमाना आहे असे बोलले जाते हे खर आहे आणि त्यातही 'रिल्स' चा जमाना आलाय आणि तो एका अर्थाने नशा म्हणून भिनताना दिसत आहे. साधारण मोबाईल व सोशल मिडिया ही युवा पिढीची मक्तेदारी आहे असं म्हणत असताना एक वेगळं वास्तव या 'रिल्सनं' समोर आणलय ते म्हणजे याला वयाचं बंधन नाही.

जो उठतो तो रील काढतो आणि यातून एक समाज म्हणून उभे राहणार स्वतःला जगाच्या स्पर्धेत सिद्ध करण्याचं वेड समोर येत. यात 'इन्फल्युएन्सर' म्हणून ओळख निर्माण झाली तर मोठ्या प्रमाणावर आर्थिक प्राप्ती शक्य आहे हे नव्या पिढीला ज्ञात झाल्यापासून यातील रस वाढणं सहाजिक होतं परंतु वास्तवात या वेडानं अनेक समस्यांना जन्म घातलाय. यात मानसिक आरोग्य आणि त्याच्याशी निगडित प्रश्न आपल्याला नव्या पिढीला चक्क नैराश्य, वैफल्ये आणि सर्वात गंभीर म्हणजे आत्महत्या असा प्रवास करणारे अनेक जण दिसत आहेत.

अगदी सकाळपासून अनेक आयुष्याची निगडित प्रश्न, पोस्ट टाकणारे नंतर कधी कॉपी-पेस्ट फॉरवर्ड करायला लागतो याचं भान राहत नाही. यात राजकीय भूमिका आवडली म्हणून पाठवले जाणारे संदेश,मिम्स याच्या जोडीला त्या त्या दिवशीचा ट्रेन्ड फॉलो करीत अचानक विद्यापीठातून उच्च शिक्षणासाठी बाहेर पडावे त्याप्रमाणे आता हे सर्वजण सोशल मिडियावरील रिल्स च्या मागे लागले आहेत.

सेल्फीच्या नादात असो अथवा रिल्सच्या नादात अनेक जण जीव गमावत आहेत याचं मुख्य कारण म्हणजे आपल्याला अधिकाधिक लाईक मिळावेत आणि आपल्या फॉलोअर्सची संख्या वाढावी ज्यातून आपल्याला पैसा मिळेल हा गैरसमज हेच आहे मुळात आज या माध्यमातून अनेक कलाकार समोर आले, लोकप्रिय झाले आणि त्यांनी पैसा देखील मोठ्या प्रमाणात कमावला हे खर आहे मात्र मुळात ते टॅलेंट त्यांच्यात होतं आणि त्यांच्यातील ते गुण जनतेपर्यंत पोहोचविण्याचा दुवा ही माध्यमे ठरली हे जाणून घेतलं पाहिजे.

आपण स्वतःला कितीही स्टार आणि सुपरस्टार समजत असलो तरी इतरांच्या दृष्टीने आपण काय आहोत हे आपण जाणून घेतलं पाहिजे. घरातील ४ जण कौतुक करतात म्हणून आपण मोठे होत नाहीत याची माहिती किती जणांना आहे? खोट्या अहंकाराचा छोटासा हा बुडबुडा मनात तयार झाल्यावर त्याला छान म्हणत फुंकर घालून फुगविणारे आसपास आहेतच ना. इथं इंटरनेटवर जगाच्या रंगमंचावर तुम्ही ज्यावेळी उभे राहता त्यावेळी खरं खोटं याचा कस लागतो आणि भ्रमाचा भोपळा फुटल्यावर अनेक जण नैराश्यात जातात ही अतिशय भयानक बाब आहे.

या प्रवासात आजवर अनेक जणांनी नैराश्यातून पुढे मृत्यूला कवटाळलं आहे, मात्र आपण आता जाग व्हावं, पालकांनीही याकडे लक्ष देण्याची वेळ आली आहे.

एखादं गाणं, संगीत किंवा नृत्य देशामधील भौगोलिक रेषा सहज पार करतं भाषा भिन्न असली तरी भावना समान आहेत म्हणून भावनिक पातळीवर होणारं सादरीकरणं भाषेच्या मर्यादा ओलांडून वैश्विक पातळीवर पोहोचतं तशा पद्धतीचा सादरीकरण प्रत्येकाला शक्य नाही आणि त्याच्यामागे आपण धावलो तर नैराश्यच येणार आहे याचं भान या बेगडी विश्वातील अर्थात व्हर्च्यअल विश्वातील भ्रमंतीत टाकलं गेलंच पाहिजे आणि त्यातूनच आपण सावध राहू शकतो.

**-प्रशांत दैठणकर**
**जिल्हा माहिती अधिकारी, बीड**

# तलवाड्यात तरुणाला चिरडनारा तो ट्रक वाळूचा

## चालकासह मालकावरही सदोषमनूष्य वधाचा गून्हा दाखल करा

**गेवराई । प्रतिनिधी**

एममिनार मस्जित मधून नमाज अदा करूण बगेवाडीला जार्नाय़ा एका मुस्लीम युवकाला एका ट्रकने समोरून जोराची घडक दिली असल्याची घटना आज ( दि २ एप्रिल ) रोजी दूपारी घडली असून तलवाडा पोलिसांनी चालकाला बेड्या ठोकल्या आहेत.

याबाबद सविस्तर माहिती अशी की, युनूस शेख ( वय ३२ वर्ष ) राहणार बगेवाडी तालूका गेवराई जिल्हा बीड असे या अपघातात मयत झालेल्या तरूणांचे नाव असून तलवाड्यात दूपारची नमाज अदा करायला हा तरूण आला असल्याची माहिती असून तसेच एम एच २३ डब्ल्यू ९४०० असा या बारा टायर ट्रक चा क्रंमाक असून सदरची गाडी ही वाळूवर चालत असल्याची माहिती असून हीचा मालक नेकनूर याठिकाणचा आहे व तो तलवाडा पोलिसांची संबंधीत आहे सदर प्रकरण हे गंभीर स्वरूपाचे असून सदरचा चालकाने मद्यप्राषन केले असल्याचे दिसून आले असून तो या तरूणास चिरडून भरघाव वेगाने निघून जात असतांना तलवाडा याठिकाणच्या नागरिकांनी जिवाची बाजी लाऊन हा ट्रक पकडला




आहे सदर प्रकरणात पोलिसांनी आपली भूमिका चोख बजवावी व सदोष मनूष्यवधाचा गून्हा यात दाखल करावा आत्तापर्यंत खूप वाळू बळी गेले असून चालकासह मालकालाही या गून्ह्यात आरोपी करावे दिवसा ढवळ्या तलवाडा परिसरातून जार्नाय़ा वाळूच्या गाड्या कायदा व सुवैस्थेचा प्रश्न निर्माण करत आहेत यांची दक्षता वरिष्ठांनी घ्यावी अशी मापक अपेक्षा वरिष्ठ पोलिस उप विभागिय अधिकारी नीरज राजगूरू यांच्याकडून आहे.

# कापसी येथे तलवार घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या फरार गुन्हेगाराला अटक

अंमळनेर । प्रतिनिधी

काल दि ०१/०४/२०२४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता कापशी येथील सरपंच बाळासाहेब गरजे व इतर लोकांनी फोन करून ठाणे प्रभारी श्री सपकाळ साहेब यांना फोन करून सांगितले की मौजे कापसी तालुका आष्टी येथे अंकुश मोहन मोरे वय ३८ वर्ष राहणार कापसी तालुका आष्टी जिल्हा बीड हा गावांमध्ये तलवार घेऊन फिरत असून तो गावातील लोकांना दमदाटी करून दहशत माजवत आहे अशी माहिती मिळाल्याने ठाणे प्रभारी सपोनी सपकाळ सोबत पोलीस कॉन्स्टेबल योगेश बहिरवाळ श्याम खाडे व सुधाकर जायभाय चालक विठ्ठल वारे असे कापशी येथे




जाऊन तलवारीसह अंकुश मोरे यास कापसी फाटा येथे पाठलाग करून पकडले व पोलीस ठाणे अमळनेर येथे आणले .अंकुश मोरे हा मागील दोन वर्षापासून अमळनेर पोलीस ठाण्यातील गंभीर गुन्ह्यामध्ये फरारी होता. काल त्याच्यावर शस्त्र अधिनियमानुसार नवीन गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास अटक करण्यात आली आहे तसेच मागील फरार गुन्ह्यांमध्ये देखील अटक करण्यात येणार आहे त्यास आज न्यायालयीन कोठडी कामी कोर्ट आष्टी येथे हजर केले आहे.पुढील तपास सपोनी सपकाळ साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मंजुळे पोलीस नाईक गरजे पोलीस कॉन्स्टेबल बहिरवाळ,खाडे,जायभाय हे करीत आहेत.

# दिंद्रुड येथे रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी




दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील श्री विघ्नहर्ता हॉस्पिटल च्या वतीने मधुमेह, हृदयरोग, थायरॉईड बाधित रुग्णांच्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. २७५ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. आयुष्यमान भारत मिशनचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांची या शिबिरात भेट दिली.

येथील श्री विघ्नहर्ता हॉस्पिटलच्या वतीने ज्या रुग्णांना मधुमेह, हृदयरोग, थायरॉईड चा त्रास आहे अशांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन डॉ. रवींद्रकुमार मुंडे यांनी रविवारी केले होते. हृदयरोग तज्ञ डॉ.राधाकिसन डाके डॉ.सुनील बोबडे डायबेटोलॉजिस्ट डॉ. प्रविण राठोड यांनी ही मोफत तपासणी केली. हृदयाचे बायपास झालेल्या रुग्णांना यावेळी मोफत सल्ला व आरोग्य तपासणी करण्यात आली. ग्रामीण भागातील रुग्णांना तालुक्याच्या व जिल्ह्याच्या ठिकाणी ये जा करताना होणारा त्रास टाळण्यासाठी या आरोग्य शिबिराचे आयोजन केल्याचे डॉक्टर रवींद्रकुमार मुंडे यांनी माध्यमांना बोलताना सांगितले.

# वंचित बहुजन युवक आघाडीच्या तालुकाध्यक्ष पदी विनोद सौंदरमल

**गेवराई । प्रतिनिधी**

ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशावरून प्रदेश अध्यक्ष नीलेश विश्वकर्मा यांच्या स्वाक्षरीचे पत्र कडून बीड निरीक्षक अमोल लांडगे व वंचित बहुजन आघडीचे युवक जिल्हा अध्यक्ष अनुरथ वीर यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई वंचित बहुजन युवक आघाडी तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे यात विनोद उर्फ बंटी सौंदरमल यांची वर्णी लागली आहे तर तालुका महासचिव सुदाम मोरे,राहुल त्रिभवण,तालुका उपाध्यक्ष सुधाकर केदार,गौतम वाव्हाळ,निजाम पठाण,शेख अखीलभाई रज्जाक,बाबासाहेब मुळीक,तालुका सहसचिव मगर गुलाबराव,भागवत जाधव,



तालुका संघटक मिलिंद तायडे, सहसंघटक प्रकाश पाटेकर,ससाणे जनर्धन,कोषाध्यक्ष सचिन साळवे,सहकोषध्यक्ष गणेश ससाणे,सदस्य प्रशांत राऊत,राहुल तुरुकमारे,विनोद चव्हाण,सुनील कांबळे,संभाजी मुळूक,उमेश ससाणे,यांची निवड करण्यात आली आहे अधिक माहिती अशी की लोकसभा निवडणुका व विधान सभा निवडणुका डोळ्यासमोर आल्याने वंचित बहुजन युवक आघाडी कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे विनोद उर्फ बंटी सौंदरमल यांची अध्यक्षपदी निवड झाल्याची माहिती कळताच कार्यकर्त्या मध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे व कार्यकर्ता मध्ये ऊर्जा निर्माण झाली आहे तसेच ठिकठिकाणी सत्कार करून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे विनोद उर्फ बंटी सौंदरमल हे भारिप बहुजन महासंघ ते वंचित बहुजन आघाडी चे माजी तालुकाध्यक्ष होते पक्षाने त्यांची तिसऱ्यांदा निवड केली त्यावेळी पक्ष वाडी साठी अथक परिश्रम करून गाव तेथे शाखा स्थापन केलेल्या होत्या.

पान ६ वरून...

## ३९ बीड मतदार संघातील

सर मिसळ केली जाईल. यामधून २८२४ बॅलेट युनिट आणि २८२४ कंट्रोल युनिट आणि ३०५९ व्हीव्हीपॅट चे संगणीकृत पद्धतीने सरमिसळ होणार असून यानंतर हे मतदान यंत्र विधानसभा निहाय वाटप करणेकरीता गोदाम उघडण्याची परवानगी व ईव्हीएम मशीन्स विधानसभा निहाय स्थलांतर करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

त्याप्रमाणे बुधवारी १० एप्रिलला सकाळी ११.०० वा. २२८-गेवराई, २२९-माजलगांव, २३०- बीड, २३१-आष्टी, २३२-केज, २३३-परळी विधानसभा मतदार विभागासाठी ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन्सचे प्रथम सळमिसळ (१ ) आयोजित करण्यात आली आलेली आहे. सळमिसळ (१ ) प्रक्रियेनंतर यानंतर या ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीन भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे आणि विहित कार्य पद्धतीप्रमाणे योग्य त्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येतील अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी कळविले आहे.

## सांगली लोकसभेवर

पत्रानंतर आता सांगलीच्या राजकीय वर्तुलात चर्चा रंगलेल्या आहेत.

सांगली लोकसभा मतदारसंघासाठी चंद्रहार पाटील यांना उमेदवारी देण्याची घोषणा केली असली तरी या जागेवरील दावा सोडण्यास काँग्रेस तयार नसल्याचं चित्र आहे. जिल्ह्यातील काँग्रेस नेते विश्वजीत कदम यांच्यासह पक्षाचे इच्छुक उमेदवार विशाल पाटील यांनी थेट दिल्ली गाठत काँग्रेस पक्षश्रेष्ठींच्या गाठीभेटी देखील घेतल्या आहेत. सांगली हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे आणि कोणत्याही स्थितीत महाविकास आघाडीच्या जागावाटपात काँग्रेसने ही जागा सोडू नये, अशी या नेत्यांची आग्रही मागणी आहे. विश्वजीत कदम यांच्यासह जिल्ह्यातील काँग्रेस नेत्यांनी नवी दिल्ली येथे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह पक्षाचे सरचिटणीस के. सी. वेणूगोपाल आणि मुकूल वासनिक यांची भेट घेऊन चर्चा केली. या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना विश्वजीत कदम यांनी आक्रमक शब्दांत आपली भूमिका देखील स्पष्ट केली होती.

पान १ वरून...

## द्वारकादास मंत्री बँकेत

तसेच प्रशासकापुर्वी बँकेने २१६ कोटी रु कर्जे वाटप केलेले होते. परंतु बँकेत निर्बंध लागल्यामुळे नियमित असलेले खाते बंद झाले व त्यामुळे बँकेला होणाऱ्या नफ्यामध्ये घट झाली कारण नियमित कर्जखात्याचे व्याज येणे बंद झाल्यामुळे बँक आर्थिक अडचणीत सापडली होती पुढे संचालक मंडळाने थकबाकी वसुली करण्यास सर्व परिने प्रयत्न केले. त्यामुळे रिझर्व बँक ऑफ इंडियाने बँकेवरिल पुर्ण निर्बंध उठवुन बॅक पूर्ववत चालू केली असल्याची माहिती सारडा यांनी दिली.

चालू अर्थिक वर्षात बँकेला रु एक कोटी ऐंशी लाख एवढा नफा झाला आहे. तर बँकेचा सी आर ए आर हा ९ टक्के असल्यास बँक उत्तम आहे असे रिझर्व बँक म्हणते. तो बँकेचा सी आर ए आर हा २६.७९ टक्के आहे. तर बँकेचे नेटवर्थ हे दहा कोटी सत्तावन लाख एवढे आहे. यावरुन बँक किती आर्थिक दृष्ट्या सक्षम आहे. हे बँकिंग क्षेत्रातील जाणकाराला वेगळे सांगण्याची गरज नाही. असे अध्यक्ष डॉ.आदित्य सारडा म्हणाले. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष श्री शुभम चितलांगे, सी.ए. गिरिषजी गिल्डा, डॉ. आदिती सारडा, सौ. अंजली पाटील, श्री. संतोष लहाने, डॉ. अरुण मुंडे, श्री. सुधाकर वैष्णव, श्री. रघुनाथ चौधरी, श्री. राम गायकवाड, श्री. सतिष धारकर, श्री. राहूल खडके, श्री. प्रल्हाद वाघ, श्री. दिनेश देशपांडे, श्री. शेख सलीम तसेच बँकेचे प्रभारी मुख्यकार्यकारी अधिकारी श्री. एस. एच. मोमीन, श्री. राधेश्याम सोनी व बँकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**बँक मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप करणार, गरजवंतांनी संपर्क साधावा- डॉ.आदित्य सारडा**

बँकेचे भागभांडवल वीस कोटी अठ्ठावीस लाख आहे. रिझर्व फंडस हे पंधरा कोटी अठ्ठावीस लाख इतके आहेत. जवळपास १५१ कोटी कर्ज वसुल झाल्यामुळे बँकेला कर्ज वाटप करणे आवश्यक आहे. बँकेचे पुर्ण डिपॉझिट गेले तरिही बँकेकडे स्वतःचे ३६ कोटी रूपये आहेत. बँकीगच्या हिशोबाने विचार केल्यास जवळपास पंच्याऐंशी कोटी रूपयाचे कर्ज देणे फार गरजेचे आहे. त्यामुळे ज्यांना आर्थिक अडचण आहे त्यांनी बँकेस संपर्क साधण्याचे आवाहन बँकेचे अध्यक्ष डॉ.आदित्य सारडा यांनी केले आहे.

पान १ वरून...

## बाबा रामदेव, आचार्य बाळकृष्ण

फेटाळून लावला. पतंजलीचा प्रसारमाध्यम विभाग काही वेगळा नाही. मागच्या सुनावणीत प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतरही भ्रामक व खोट्या जाहिरातींचा प्रचार सुरूच आहे. ही अतिशय गंभीर बाब असून पुढच्या आठवड्यात व्यक्तिशः हजर राहून माफीनामा सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

## १० एप्रिलला नरेंद्र

व्यवस्थापन समितीची बैठक प्रभारी डॉ. दिनेश शर्मा यांच्या उपस्थितीत पार पडली. महाराष्ट्रात निवडणुकीच्या दृष्टीने व्यूहरचना काय आहे, कशा प्रकारची व्यवस्था, यंत्रणा उभी आहे. या यंत्रणेची अंमलबजावणी नेमकी कशा पद्धतीने होतेय याचा आढावा आणि मार्गदर्शक सूचना डॉ. दिनेश शर्मा यांच्या माध्यमातून देण्यात आल्या. व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून एकेकावर जबाबदारी देण्यात आली आहे असे त्यांनी सांगितले.

## मोदी सरकारने खरीपातला

अपलोड करण्यात आले आहेत. उत्पादनाचे हे आकडे गृहीत धरून विमा कंपन्याकडून नुकसानभरपाईचा दावा निश्चित करण्यात आला आहे. त्यानंतर शेतकऱ्यांना उर्वरित नुकसानभरपाई मिळू शकते परंतु अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झालेली नाही. पीककापणी अहवालानुसार राज्यातील नगर व नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उर्वरित ७५ टक्के मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तसेच उडीद, मूग व बाजरी पिकांच्या पीक कापणी अहवालातही उत्पादनात ५० टक्क्यांपेक्षा जास्त घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळणार अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महाराष्ट्रातील सव्वा कोटी

कृती समितीच्यावतीने 'राज्यव्यापी 'राजकीय संम्मेलन घेण्यात आले. या संमेलनात सर्व संघटनांच्या कामगार प्रतिनिधींनी हात उंचावून या ठरावाला पाठिंबा दिला. इंटक, आयटक, एसएमएस, सिटू, बीकेएसएम, एआयसीसीटीयू, राज्य सरकारी कर्मचारी संघटना महासंघ, शिक्षक संघटना, बँक आणि विमा संघटना महासंघ, श्रमिक एकता मंच आणि तळागाळातील कामगारांचे नेतृत्व करणाऱ्या अनेक संघटना या राज्यस्तरीय राजकीय संमेलनात सहभागी झाल्या होत्या. यावेळी समितीचे प्रमुख सिटुचे डॉ.डि.एल.कराड यांनी ठरावावर आक्रमक भाषण करताना कामगारांना आवाहन केले की, महाराष्ट्रात आपल्या सर्व कामगार

पान १ वरून...

संघटनांचे एकूण सभासद सुमारे ३५ लाख असून, त्याचे कुटुंबिय मिळून कोटी-सव्वा कोटीचे मतदान आपल्या हातात आहे. महाराष्टात एकूण ९कोटी मतदान असून त्यातील १ कोटीच्यावर आपल्याकडे मतदान आहे.

आपण कामगार कर्मचारी यावेळी मोदी सरकारचा नक्की पाडाव करू. कामगार विरोधी मोदी सरकारला सत्तेवरुन खाली खेचू, असा विश्वास कराड यांनी व्यक्त केला. तर महाराष्ट्र इंटकचे अध्यक्ष निवृत्ती धुमाळ कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना म्हणाले, येणारा १ मे कामगार दिन मोदी सरकार विरोधी कामगार निषेध दिन पाळतील, असे आवाहन केले.

प्रसंगी महाराष्ट्र इंटकचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते, सिटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. डी.एल.कराड, सिटू चे कॉ.विवेक मोंटेरो, एनटीआयचे कॉम्रेड मिलिंद रानडे,भारतीय कामगार सेनेचे संतोष चाळके, आयटकचे , कॉ. उदय चौधरी, इंटकचे निवृत्ती धुमाळ, कॉ.उदय भट, आदी कामगार नेत्यांनी नरेंद्र मोदी सरकार व अदाणी, अंबानी भांडवलदारावंर जोरदार टीका केली. या कामगार नेत्यांनी मोदी हटाव, भांडवलदार हटाव असा नारा दिला. तसेच डॉ.कैलास कदम, कॉ. त्रिशाला कांबळे, कॉम्रेड आरमाइटी इराणी, कॉम्रेड सईद अहमद, कॉम्रेड भूषण पाटील, बजरंग चव्हाण, दादासाहेब डोगरे, कॉ. उज्वला पडलवार आदी नेत्यांनी ठरावाला पाठिंबा दिला.

## समन्यायी पाणी वाटप

चर्चीला जात होता. जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी विधीमंडळात सातत्याने जायकवाडीच्या पाण्याचा प्रश्न अभ्यासू पध्दतीने मांडून त्याला वाचा फोडली. शासनाने सन २००५ मध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन कायदा अस्तित्वात आणला, या कायद्यालाही नगर जिल्ह्यातील विविध संस्थांच्यावतीने न्यायालयात आव्हान देण्यात आले. उच्च न्यायालयाने याप्रकरणी धोरण ठरविण्याचे आदेश शासनाला दिले. न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने सुत्रबध्द धोरण अस्तित्वात आणले. या धोरणालाही पुन्हा सर्वोच्च न्यायालयात आव्हानीत करण्यात आले. ज्या-ज्यावेळी मराठवाड्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण होते त्या-त्यावेळी कायद्यातील तरतुदींना आव्हानीत करण्याचे काम नगर आणि नाशिक जिल्ह्यातील राजकीय नेत्यांनी केले होते. याप्रकरणात सन २०१४ पासून उच्च न्यायालयात ३३ याचिका तर सर्वोच्च न्यायालयात ३ याचिका दाखल झालेल्या आहेत.माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी विधीमंडळात अभ्यासपूर्ण मांडणी केली, शारदा प्रतिष्ठान, गेवराई या त्यांच्या संस्थेच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका क्र.आय.ए. १५५५६९ /२०१८ नुसार माध्यमातून न्यायालयीन लढा दिला आणि अनेकवेळा रस्त्यावर उतरून त्यांनी संघर्ष केला.

cmyk

## आदित्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे अंथरवन पिंपरीत श्रमदान

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात विद्यार्थ्यांना स्वत:ला सिध्द करण्याची एक संधी मिळते. त्यांच्यातील कला गुणांना वाव मिळतो. आदित्य कृषी अभियांत्रिकी व आदित्य अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे अंतरवन पिंपरी येथे सात दिवसीय विशेष शिबिरस संपन्न झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी गावात श्रमदान करत. ग्रामस्थांना स्वच्छता, आरोग्य, पाणी नियोजनाचे महत्व हे पटनाट्यातून पटऊन दिले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी सलग्नित आदित्य शिक्षण संस्था अंतर्गत आदित्य कृषी अभियांत्रिकी व आदित्य अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत बीड तालुक्यातील अंथरवन पिंपरी येथे सात दिवस विशेष शिबिर संपन्न झाले. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक मा. सुभाषचंद्र सारडा यांच्या ठरवून दिलेल्या उद्धिष्टाप्रमाणे व वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी परिषद सदस्या डॉ. आदितीजी सारडा यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले. युवकांचा ध्यास, ग्राम शहर विकास शिबिराअंतर्गत विविध उपक्रम राबवण्यात येणार आले. समारोप प्रसंगी प्राचार्य श्याम भुतडा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून श्रमदान करून सामाजिक कार्यास हातभार विद्यार्थ्यांनी लावला पाहिजे असे आवाहन केले. प्रा. गुजर, प्रा.उबाळे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. सुत्रसंचालन प्रा. गुजर यांनी तर आभार प्रदर्शन उबाळे यांनी मानले.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि.३ एप्रिल २०२४


# सव्वा ते दीड लाखाचे पॅकेज देऊनही सालगडी मिळेना

## शेतकरी अडचणीत: माजलगाव तालुक्यात सालगड्याला आला लाखोंचा भाव

ज्योतिराम पांढरपोटे

माजलगाव:- गुढीपाडव्या पासून शेतकऱ्यांच्या शेतीच्या हंगामाचे नवे वर्ष सुरू होते. त्यामुळे पुढील शेती हंगामासाठी नवा सालगडी ठेवण्यासाठी शेतकऱ्यांकडे सालगड्यांनी विविध पॅकेजची मागणी केल्यामुळे माजलगाव तालुक्यात सालगड्याला सव्वा ते दिड लाखाचा भाव आला असून ऐनवेळी नवीन वर्षात शेतकरी अडचणीत सापडला आहे.सव्वा ते दीड लाख रुपयांचे पॅकेज देऊनही सालगडी मिळेना,अशी स्थिती माजलगाव तालुक्यातील बहुभुधारक शेतकऱ्यांची झाली आहे.



माजलगाव तालुका हा सिंचनाचा वापर करणारा तालुका असून सध्या तालुक्यातील शेतकरी हा उस लागवडीसह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत फळबाग लागवडीकडे वळाला आहे. शेतीत कामे करण्यापेक्षा शहराकडे ग्रामीण भागातील नवीन पिढी धाव घेत असल्यामुळे शेतमालकांना सालगडी मिळणे कठीण झाले आहे. शेतातील गहू निघताच नवीन सालगडी पुढील हंगामात ठेवण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये आपआपसातच स्पर्धा लागली आहे. निसर्गाच्या लहरीपणावर तालुक्यातील ग्रामीण भागातही खेळला जाणारा शेती जुगार असल्याची भावना नवीन पिढीत निर्माण झाल्याने ती शहरात लहान-मोठे काम करण्यास उत्सुक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची दुसरी पिढी शेती करण्यासाठी तयार नाही,त्यातच सालगडी व मजुराचा तुटवडा शेतीच्या कामासाठी निर्माण झाल्याने, शेतमालकांची मोठी कोंडी होत असून, शेतमालक या गावावरून त्या गावावर सालगड्याच्या शोधत फिरत आहे. त्यासाठी कोणी कोणी बिहार, मध्यप्रदेशातून कुटुंबासह सालगडी आणत आहेत. माजलगाव तालुक्यात गेल्या वर्षी पाऊस कमी झाल्याने पुढील हंगामातील शेतीसाठी शेतकऱ्यांना गुढीपाडव्याला नवा सालगडी ठेवला आहे.परंतु यावर्षी त्याच्या मागणीत मोठीच वाढ झाल्याने शेतकरी मेटाकुटीला आला आहे.शेतकऱ्यांनी काही जणांच्या साल दारात वाढ करुन त्यांना पुढच्या एका वर्षाला सव्वा लाख ते दीड लाख रुपायांपर्यंत साल ठरवले जात असून त्यातही काम करत असताना खाडे न धरण्याची मागणी सालगड्यानी केली आहे.

### यंदा सालगड्यांच्या मागणीत वाढ

यंदा सालगड्यांनी सालाच्या पैशाव्यतिरिक्त मोबाईल व त्याच्या रिचार्जचा खर्च, वर्षाला दोन किंटल गहू, दोन किंटल ज्वारी, त्यासोबतच शेतात टी. व्ही. पाहण्यासाठी डिश व दुधाची मागणी सालगडी करतात. याशिवाय सालगड्याच्या बायकोला वर्षभर शेतात काम मिळते. त्याचा वेगळा मोबदला शेतकऱ्याना द्यावा लागतो.वर्षासाठी काम केले तर काहीनी साल दर कायम करण्यास असमर्थता दाखविल्याने नवा सालगडी शोधण्यासाठी शेतकऱ्यांना कसरत करावी लागत आहे. हुशार,मेहनती, निर्व्यसनी सालगड्याला सर्वच शेतकऱ्यांनी प्रथम पसंती दिली आहे.

### नवीन शोधण्यापेक्षा जुन्यालाच सालदर वाढवला

मी ऊस पिक लागवडीसह कापुस, सोयाबीन गहु, ज्वारी हरभरा हे पिके घेत आहे. माझ्याकडे जनावरे व बंदिस्त उस्मानाबादी शेळी पालन असल्याने माझ्याकडे चार ते पाच सालगडी कामाला आहे. त्यापैकी दोन सालगडी हे परभणी जिल्ह्यातील मानवत येथील आहेत,तर दोन सालगडी गावातीलच ते माझ्याकडे अत्यंत चांगल्याप्रकारे काम करत असून नवीन सालगडी बघण्यापेक्षा जुन्याच सालगड्याला साल दरवाढ करुन त्यांनाच कामावर ठेवले आहे.



**रामराव बाबासाहेब जाधव, बहुभुधारक शेतकरी, आडोळा**

### मर्जीप्रमाणे रक्कम, कशाला दुसरीकडे जायचे

मागील दहा ते पंधरा वर्षांपासून मी रामराम जाधव यांच्याकडे सालाने सालगडी म्हणून काम करत असून, रामराव जाधव शेती मालक स्वभावाने चांगले आहेत. त्यामुळे मी दुसरीकडे कुठेही जाण्याचा विचार करत नाही.प्रत्येक वर्षी मला माझ्या मर्जीप्रमाणे सालाची रक्कम व धान्य मिळते.

**- वैजनाथ तानाजी भाले, सालगडी**

## अंबाजोगाईत पंचायत विकास मॉलचा भव्य उद्घाटन सोहळा



अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात पंचायत विकास मॉल चा भव्य शुभारंभ रविवार दिनांक ३१ मार्च ला विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला पंचायत विकास मॉल च्या शुभारंभचे औचित्य साधून अंबाजोगाई तालुक्यातील ६ गरजवंत मुलींना आर्थिक मदतीचा धनादेश त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारत सौ वैष्णवी विनोद देशमुख यांनी सामाजिक बांधिलकी जपत एक आदर्श घालून दिला.ग्रामीण भागातील विकासाच्या दृष्टीने पंचायत विकास मॉल च्या माध्यमातून सर्व सुख सुविधा एकाच छताखाली वैष्णवी विनोद देशमुख यांनी नागरिकांस उपलब्ध करुन दिल्या आहेत. पंचायत विकास मॉल च्या माध्यमातून ग्रामीण भागात अल्पदरात घरकुल, ग्रामीण भागातील शाळा डिजिटल करणे तसेच शासनाच्या विविध योजनेअंतर्गत ग्रामीण भागात विकासाची गंगा आणण्याचे काम पंचायत विकास मॉलच्या माध्यमातून अगामी काळात प्रांतप्रधान यांच्या स्वप्नातील ग्रामीण विकास होणार असून सर्वच प्रकारच्या वस्तू या मॉल मध्ये उपलब्ध आहेत.पंचायत विकास मॉल अंबाजोगाई व ग्रामीण भागातील नागरिकांसाठी परवणी ठरणार असल्याचे मत मान्यवरानी व्यक्त केले.

पंचायत विकास मॉल च्या उदघाटन प्रसंगी अंबाजोगाई तालुक्यातील पल्लवी ढवळे, ज्ञानेश्वरी धायगुडे, शेख बसेरिया मुश्ताक,विद्या राठोड,वैष्णवी ढाकणे या विविध जाती धर्मातील ६ गरजवंत होतकरू मुलींना आर्थिक मदतीचा धनादेश देत त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेत व्यवसायाची सुरवात सामाजिक बांधिलकी जपत सौ वैष्णवी विनोद देशमुख यांनी सर्वापुढे हा आदर्श घालून दिला आहे. पंचायत विकास मॉल च्या उदघाटन प्रसंगी राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, भाजप तालुकाध्यक्ष अच्युत गंगणे,जनविकास कॉलेज बनसारोळा प्राचार्य बाबासाहेब गोरे,शिवाजी शिक्षणसंस्था मुख्याध्यापक राजेश आडसकर, उद्योजक विलास लिखे, आधार माणुसकीचा अध्यक्ष ॲड संतोष पवार,अंबाजोगाई ग्रामसेवक संघटना उपाध्यक्ष रामप्रभू तिडके,उद्योजक अशोक तापडिया,हनुमान संस्कृतीक क्रीडा मंडळ अध्यक्ष प्रवीण देशमूख,डिजिटल मीडिया अध्यक्ष अभिजीत लोमटे,उद्योजक नितीन ठोंबरे,उद्योजक बाळासाहेब नवाडे,आसरडोह सरपंच रविकिरण देशमुख,युवा उद्योजक अक्षय परदेशी, अश्विनी ढवळे,विनोद भैय्या देशमुख यांचे जिवलग अमरनाथ कुपटे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## गाळ काढण्यासाठी शेतकऱ्यांनी घेतली रितसर परवानगी

बीड/ प्रतिनिधी

केज तालुक्यातील सारणी सांगवी तलावातील गाळ काढून शेतात नेणाऱ्या शेतकऱ्यांची इतर शेतकऱ्यांकडून तलावातील जमिनीत मालकी हक्क दाखवून अडवणूक केली जात होती .यासंदर्भात संबंधित शेतकऱ्यांनी लघुपाट बंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी आणि केज तहसीलदारांना याबाबत कळून रितसर परवानगी घेतली आहे .या संदर्भात जर कोणी आडवणुक केली तर थेट आम्हाला कळवा अशा सूचना तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिल्या असून शेतकऱ्यांना गाळ नेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे .



तलावातून गाळ काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश काढून ज्या शेतकऱ्यांना गाळ न्यायचा आहे. त्यांना मोफत द्यावा अशा सूचना केल्या होत्या. या संदर्भात शेतकऱ्यांनी गाळ काढून नेण्यासाठी सुरुवात केली. मात्र सारणी सांगवी येथे अशा शेतकऱ्यांची तलावाच्या जमिनीवर आपला हक्क दाखवून अडवणूक सुरू होती. काही शेतकऱ्याकडून त्यासाठी पैसे मागितले जात होते. मात्र या संदर्भात सांगवी येथील शेतकऱ्यांनी केज तहसीलदार,लघुपाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे तक्रार केल्यानंतर या तक्रारीची दखल घेऊन उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांनी या शेतकऱ्यांना परवानगी दिली आहे. जर कोणी तुमची अडवणूक केली तर थेट आम्हाला कळवा आम्ही त्यांचा बंदोबस्त करू असे आश्वासन यावेळी शेतकऱ्यांना दिले .सांगवी येथील शेतकऱ्यांनी जवळपास साडेपाच हजार ट्रॉली गाळ काढण्याची परवानगी शासनाकडे मागितली आहे. तलावातील गाळ बाहेर निघाला तर मोठ्या प्रमाणात पाणीसाठा होऊन याचा फायदा भविष्यकाळात शेतकऱ्यांनाच होणार आहे .सध्या जिल्ह्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे .जर तलावातील गाळ निघाला आणि पाणीसाठा वाढला तर जिल्हाभरातील पाणी प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. यासंदर्भात प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. मात्र काही ग्रामस्थांकडून यासाठी अडथळा निर्माण केला जात आहे. अशा लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनाने तयारी केली असून जो कोणी शेतकऱ्यांची करतांना आढळून येईल त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल असेही प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

## सय्यदा हिबाचा वयाच्या पाचव्या वर्षी आयुष्यातील पहिला रोज़ा पूर्ण

बीड । प्रतिनिधी

सय्यद निसार शरीफ मियाँ यांची मुलगी सय्यदा हिबा हिने आपल्या आयुष्यातील पहिला रोज़ा वयाच्या पाचव्या वर्षी पूर्ण केला.सध्या पवित्र रमजान महिन्याचे रोज़े सुरू आहेत.



रमज़ान महिना आता शेवटच्या टप्प्यात आला आहे. सय्यदा हिबा हिने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा ठेवला व तो यशस्वीरित्या पूर्ण केला. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने सूर्य अक्षरशः आग ओकत आहे. तप्त उन्हामुळे भल्याभल्यांच्या जीवाची लाहीलाही होत आहे. अशा अवस्थेत लहान मुली व मुले आपल्या आयुष्यातील पहिला रोज़ा धरत आहे. यामागे अल्लाहकडून रोज़ेदारांना मिळणारी अदृश्य ताकद असते म्हणूनच चिमुकले रोज़ेदार कमी वयातही आपले रोज़े पूर्ण करू शकतात. असेच सय्यद हिबा हिनेही वयाच्या पाचव्या वर्षी आपल्या आयुष्यातील पहिला रोज़ा पूर्ण केला. याबद्दल पीर व मुरशीद हज़रत रौशनमियाँ, हज़रत महेमूद मियाँ, हज़रत नुसरत तनवीर मियाँ, हज़रत रेहान मियाँ यांच्यासह सर्व नातेवाईक, दर्गाह दायरा येथील सर्व रहिवासी यांनी अभिनंदन केले व त्याने यापुढेही दरवर्षी रमज़ान महिन्याचे पूर्ण रोज़े ठेवावे अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

## प्रा. हजारे यांची मुख्याध्यापक तथा प्राचार्यपदी पदोन्नती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील आपेगाव येथील जयकिसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक तथा प्राचार्य पदी सेवाजेष्ठतेने प्रा. निळकंठ कल्याणराव हजारे यांची पदोन्नती झाली आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

आपेगाव येथील जयकिसान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील पुर्वीचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य सेवानिवृत्त झाले होते. या रिक्त झालेल्या पदावर सेवाजेष्ठतेने प्रा. निळकंठ हजारे यांची १ फेब्रुवारी २०२४ पासून जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकरी नागनाथ शिंदे यांनी १ एप्रिल २०२४ रोजी मंजुरी दिली आहे. त्यानुसार संस्थेच सचिव प्रा. जयजित शिंदे यांनी प्रा.




हजारे यांना मंगळवारी (दि. २) रितसर मुख्याध्यापक तथा प्राचार्य पदाचा पदभार दिला. पदभार स्विकारल्यानंतर कर्मचाऱ्यांशी बोलतांना मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रा. हजारे यांनी सर्व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यांन शाळेची प्रगती करण्याचे आश्वासन संस्था पदाधिकाऱ्यांना दिले. निवड झाल्याबद्दल प्रा. हजारे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## श्री योगेश्वरी मल्टिस्टेला मार्च-२०२४ अखेरीस ९० लाखांचा निव्वळ नफा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजातील प्रत्येक घटकांची उन्नती हे ब्रीद घेऊन आपला व्यवहार करणारी श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को -ऑप क्रेडिट सोसायटी लि. सन २०२४ अखेर रुपये ९० लाखाचा निव्वळ नफा झाल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. संस्थेस मिळालेल्या या संपूर्ण यशाचे श्रेय हे श्री योगेश्वरी मल्टिस्टेटचे संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेला तसेच संस्थेचे माजी उपाध्यक्ष शेख खालेद यांच्या सहकार्याला दिले. तसेच त्यांच्यासोबतच श्री योगेश्वरी मल्टिस्टेटचे उपाध्यक्ष शेख अन्वर शेख वली हसन , संचालक सुधाकर टेकाळे , ॲड विलास लोखंडे , विलास सिद्राम जाधव , भागवत रामकृष्ण मसने, संकाये अप्पासाहेब , ॲड अनिल संभाजीराव लोमटे, शेख मुक्तार फकीर अहमद तसेच संचालिका सौ.खडके मंदाकिनी बाजीराव व श्रीमती आशालता वांजरखेडकर त्याचबरोबर तज्ञ संचालक सचिन लक्ष्मीकांत बजाज , आणि कांतीलाल नंदलाल शर्मा यांच्यासह संस्थेचे सर्व हितचिंतक सभासद ग्राहक , ठेवीदार ,आणि कर्जदार यांना दिले आहे.




श्री योगेश्वरी मल्टिस्टेट चे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी २०२४ चा वार्षिक ताळेबंद मांडताना प्रथमतः त्यांनी संस्थापक अध्यक्ष आणि मार्गदर्शक राजकिशोर मोदी यांचे संस्थेस ११ वर्ष यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन केले . तसेच सर्व सभासद , ग्राहक , आणि संस्थेच्या हितचिंतकांचे देखील आभार याप्रसंगी व्यक्त केले . तसेच सध्याच्या काळात अनेक बँका , पतसंस्था , मल्टिस्टेट सोसायटी नानाविध अडचणींना सामोरे जात आहेत असे असताना देखिल श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी ही नेत्रदीपक कामगीरी करत असल्याचे आनंदाने सांगितले .यात संस्थेच्या ग्राहकांचा , ठेवीदारांचा , खातेदार आणि हितचिंतक यांचा मोलाचा वाटा असल्याचे देखील आवर्जून उल्लेखित केले .पुढे संस्थेच्या आर्थिक विवेनचनात मार्च- २०२४ अखेर संस्थेकडे एकूण१७२२ सभासद असल्याचे सांगितले . त्याचबरोबर संस्थेचे भाग भांडवल एकूण ६२ लाख रुपये असल्याचे सांगताना संस्थेचा स्वनिधीं हा रुपये ०२ कोटी असल्याचे वार्षिक अहवालात नमूद केले. तसेच मार्च २०२४ अखेर संस्थेकडे एकूण ठेवी रुपये २३ कोटी एवढया असून कर्जवाटप हे रुपये २० कोटी एवढे झाले असल्याचे देखील अधोरेखित केले . श्री योगेश्वरी मल्टिस्टेट या संस्थेची एकूण गुंतवणूक ही अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँक आणि इतर संस्थेकडे मिळून रुपये ०९ कोटी ०५ लाख एवढी असल्याचे सांगितले. संस्थेच्या वार्षिक अहवालात संस्थेचा एन पी ए ३.१९ एवढा दर्शविण्यात आला आहे. मल्टिस्टेटच्या माध्यमातून अनेक लहान मोठ्या व्यापारी व ग्राहकांचे हित जोपासण्यासाठी सदैव प्रयत्न केले जात असून यापुढेही हे काम असेच अविरतपणे सूर राहणार असल्याचे याप्रसंगी रिकबचंद सोळंकी यांनी उल्लेखित केले. त्याचप्रमाणे ३१ मार्च २०२४ अखेर श्री योगेश्वरी मल्टिस्टेट या संस्थेने रुपये ९० लाख एवढा निवळ नफा मिळविला असल्याचे जाहीर केले . त्याचबरोबर एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ अखेर संस्थेने एकूण व्यवसाय रुपये ४३ कोटी एवढा करत अंबाजोगाई शहर व परिसरातील ग्राहकांना आपली सेवा देत सामान्य नागरिकांच्या आर्थिक उन्नती साठी प्रयत्न केले आहेत. संस्थेच्या मुख्यालयात एकूण ७ कर्मचारी आणि २ नित्य निधी ठेव प्रतिनिधी कार्यरत आहेत. यामध्ये मुख्य शाखा व्यवस्थापक संतोष ढगे, प्रदीप काकडे, विष्णु गुजर ,उमेश साखरे , वैभव देशमुख, संजुकुमार बिराजदार आणि अंकुश माने यांचा समावेश आहे . श्री योगेश्वरी मल्टिस्टेटच्या अंबाजोगाई आणि बसवकल्याण या दोन शहरात दोन शाखा कार्यरत असून या शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा देत असल्याचे संस्थापक राजकिशोर मोदी व अध्यक्ष रिकबचंद सोळंकी तसेच उपाध्यक्ष शेख अन्वर शेख वली हसन यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.संस्थेच्या माध्यमातून यापुढे विविध सामाजीक , शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्याचा संकल्प देखील प्रसिद्धी पत्रकातून जाहीर केला .

## गरीब व गरजूंचे मोफत डोळे तपासणी व चष्मे वाटप



बीड । प्रतिनिधी

शहराच्या बालेपीर भागात असलेल्या रोशनपुरा येथील अल्? ख़िदमा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजू रुग्णांची मोफत डोळे तपासणी करून चष्मे वाटप करण्यात आले. हा स्तुत्य उपक्रम युनिक फाउंडेशन कडून राबविण्यात आला.

हा उपक्रम रविवार दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी सकाळी १०:०० ते संध्याकाळी ०५:०० वाजेपर्यंत घेण्यात आला. यात दिवसभरात ९७ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली तर ३५ गरीब व गरजू रूग्णांना तपासणी, औषधोपचार व चष्मे मोफत देण्यात आले तर बाकीच्या रुग्णांची कॉम्प्युटर द्वारे डोळे तपासणी फक्त ५० रुपयात करण्यात आली आणि चष्म्यातही ५०% सूट देण्यात आली. ज्येष्ठ नागरिक व गरजूंना औषधोपचार व चष्मे सुद्धा मोफत देण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्याकरिता अल्? ख़िदमा हॉस्पिटलच्या सर्व टीमने परिश्रम घेतले तर या उपक्रमाचे आयोजन युनिक फाउंडेशनकडून करण्यात आले होते. प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला सर्वसामान्य व गोरगरीब रुग्णांनी चांगला प्रतिसाद दिल्याने यापुढेही असे उपक्रम ठराविक अंतराने सर्वसामान्यांच्या भल्यासाठी घेत राहू असे मनोगत यावेळी युनिक फाउंडेशनचे अध्यक्ष आबेद पठाण यांनी व्यक्त केले.

cmyk

# उन्हाचा चटका वाढला, बाजारात लिंबाला झळाळी; दरात झाली ३५० टक्क्यांची वाढ

सध्या देशाचा उन्हाचा तडाका चांगलाच वाढला आहे. वाढत्या उन्हामुळं नागरिकांच्या अंगाची काहीली होत आहे. देशातील बहुतांश भागात पारा हा ३५ अंशाच्या आसपास गेला आहे. दरम्यान, या वाढत्या तापमानात लोक लिंबू सोडा, विविध प्रकारचे कोल्ड्रिंग घेत आहेत. या स्थितीमुळं सध्या बाजारात लिंबाच्या दरात तेजी आल्याचं पाहायला मिळत आहे. ज्या शेतकऱ्यांकडे विक्रीसाठी लिंब आहेत, त्या शेतकऱ्यांना मोठा फायदा होतोय. लिंबाच्या दरात ३५० टक्क्यांची वाढ झालीय.

तापमानात वाढ झाल्यास दरात आणखी वाढ होणार

मिळालेल्या माहितीनुसार, यापूर्वी लिंबू सोडा २० रुपये प्रति कप विकला जात होता. आता लिंबू सोडा २५ ते ३० रुपये प्रति कप विकला जातोय. दरम्यान आणखी तापमानात वाढ होण्याची शक्यता वर्तवली जातेय. त्यामुळं पुढच्या काळात आणखी लिंबाच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मध्यम आकाराच्या लिंबाला प्रतिकिलो १०० रुपयांचा दर मिळत आहे. उन्हाचा चटका वाढल्यानं बाजारात लिंबाची मागणी वाढत आहे, त्यामुळं दरातही वाढ होत आहे.



लिंबाच्या दरात ३५० टक्क्यांची वाढ

सध्या कर्नाटक राज्यात किरकोळसह घाऊक बाजारातही लिंबाच्या दरात वाढ झालीय. ही वाढ ३५० टक्क्यांची झाली आहे. दरम्यान, तापमानात जर अशीच वाढ राहीली तर लिंब आणखी महाग होऊ शकते.

दुष्काळी परिस्थिती आणि बदलतं हवामानाचा पिकाला फटका

दुष्काळी परिस्थिती आणि बदलतं हवामान यांचा काही ठिकाणी लिंबाला फटका बसलाय. अनेक ठिकाणी लिंबाच्या बागांचं नुकसान झालं आहे. त्यामुळं बाजारपेठेत सध्या लिंबाचा म्हणावा तेवढा पुरवठा नाही. पुरवठा कमी झाल्याचा परिणाम दरावंर झालाय. लिंबू विक्रेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, महिना भरापूर्वी १००० लिंबाचा दर हा २००० रुपये होता. आता याच १००० लिंबाचा दर हा ७००० रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. त्यामुळं याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा होतोय.

महाराष्ट्रातील विविध भागात तापमानाचा पारा चांगलाच वाढला : हवामान तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्रातील विविध भागात तापमानाचा पारा चांगलाच वाढत आहे. वाढल्या तापमामुळ नागरिकांना त्रास होत आहे. महाराष्ट्रातील बहुतांश भागात तापमानाचा पारा ३५ ते ४० अंशावर गेला आहे. त्यामुळं नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन हवामान विभागानं गेलं आहे. दोनच दिवसात मार्च महिना संपत आहे. मात्र, यापुढेही तापमानात मोठी वाढ होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळ या उन्हाच्या पार्श्वभूमीवर सावधगिरी बाळगणं गरजेच आहे.

## शेतकऱ्यांनो केळी काळी पडण्याची ही आहेत कारणे



केळी रेफ्रिजरेटरमध्ये ठेवली तर ती चटकन काळी पडतात. लिबलिबित होतात. ती बघवतही नाहीत आणि खावतही नाहीत. सफरचंद वगैरे फळं मुळातच थंड हवामानात उगवणारी आहेत, त्यामुळे ती उष्ण हवामानात भराभर पिकून लवकर खराब होऊ लागतात. म्हणून ती टिकवून धरण्यासाठी त्यांना थंड वातावरणात, शीतगृहात ठेवणं गरजेचं होऊन बसतं. त्या थंडीचा त्यांच्यावर कोणताही वाईट परिणाम होत नाही, कारण त्या घसरलेल्या तापमानाला तोंड देण्याची क्षमता मुळातच त्यांच्यामध्ये असते. त्या फळांचे घटक असलेल्या पेशी त्या थंड हवामानात आपला संसार नीट थाटू शकतात. आपलं स्वरूप टिकवून धरतात. केळीचं तसं नाही.

केळं हे मुळातच उष्ण कटिबंधातलं फळ आहे ते उष्ण हवामानातच वाढतं. रेफ्रिजरेटरच्या थंड वातावरणात ठेवल्यामुळं ते काही भरभर पिकत नाही. उलट कडब्यामध्ये किंवा कापडात गुंडाळून ठेवलं तर ते पिकण्याची प्रक्रिया जरा जोमानं होते. झाडावरून जेव्हा केळ्यांचा घड उतरवला जातो तेव्हा ती केळी हिरवीच असतात. पिकलेली नसतात. ती जर कापडात गुंडाळून ठेवली तर ती पिकायला लागतात; पण थंड हवामानात ती ठेवली तर त्या थंडीचा त्यांच्यावर अनिष्ट परिणाम होऊ लागतो. कारण त्या तापमानाला तोंड देण्याची क्षमता त्यांच्यात नसते. त्यांना त्यापोटी इजाच होते. त्यातल्या घटक पेशींच्या अंतरंगातली रचना बदलायला लागते. त्यांचं अखंडत्वच नाहीसं व्हायला लागतं, त्या पेशींमधल्या निरनिराळ्या उपांगांना आपापलं नेमून दिलेलं काम बिनबोभाट पार पाडता यावं म्हणून त्यांच्याभोवती काही कुंपणं घातलेली असतात. त्यांना मेम्ब्रेन्स असं म्हणतात. हे कुंपणांचे पडदे फाटतात आणि सगळी सरमिसळ होते. साराच सावळा गोंधळ उडतो. थंड हवामानात राहावं लागल्यामुळं त्या केळीच्या पेशींमध्ये असे जिवावर उठणारे परिणाम होतात.

शेतकऱ्यांचे यांत्रिकीकरण गरजेचे

पेशींचं आयुष्य संपायला आलं की त्यांचा नाश करण्यासाठी ज्या प्रक्रिया अंगभूत असतात, त्या आपलं काम करायला पुढे सरसावतात. केळं नासायला लागतं. त्यापोटीच मग त्याच्या सालीवर काळे डाग पडायला सुरुवात होते. त्यांची व्याप्ती वाढून मग सगळी सालच काळीढुस्स होते. केळ्याला थंडी मुळी सोसतच नाही केळंच कशाला, त्याच्यापासून केलेलं शिकरणही रेफ्रिजरेटरमध्ये जरूरीपेक्षा जास्त वेळ ठेवलं तर काळं पडायला लागतं.

## पोल्ट्री फार्मिंग म्हणजे काय; सुरुवात कशी करावी?

परसातील कुक्कुटपालन तुम्ही तुमच्या घराच्या अंगणात किंवा घराच्या मागे असलेल्या मोकळ्या जागेत सहज करू शकता. यामुळे तुम्हाला काही देशी कोंबडीच्या जाती निवडाव्या लागतील. जेणेकरून तुमचे उत्पन्न वाढेल. देशी कोंबड्या किडे, हिरवा चारा, घरी सोललेली फळे आणि भाजीपाल्याची साले, तणांमधील धान्ये खाऊन जगू शकतात.

तुम्ही कमी खर्चात आणि कमी वेळेत तुमचा स्वतःचा फायदेशीर व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल तर कुक्कुटपालन व्यवसाय तुमच्यासाठी खूप चांगला पर्याय असू शकतो. भारतातील अंड्यांची वाढती मागणी पाहिल्यास कुक्कुटपालन हा उत्पन्नाचा चांगला स्रोत बनत आहे. कमी खर्चात हा व्यवसाय सुरू करून तुम्ही अधिक कमाई करू शकता. देशात दोन प्रकारचे कुक्कुटपालन केले जाते. ज्यामध्ये घरामागील कुक्कुटपालन आणि पोल्ट्री फार्ममध्ये कोंबड्या पाळल्या जातात. जर तुम्ही पोल्ट्री फार्ममध्ये कोंबडी पाळली तर त्यासाठी मोठी जागा आणि जास्त खर्च लागतो. परंतु परसातील कुक्कुटपालन कमी जागेत कमी प्रमाणात करता येते. कृषी जागरणच्या या लेखात जाणून घेऊया की परसातील कुक्कुटपालन म्हणजे काय आणि आपण ते कसे सुरू करू शकतो?.

घरामागील कुक्कुटपालन म्हणजे काय?

परसातील कुक्कुटपालन तुम्ही तुमच्या घराच्या अंगणात किंवा घराच्या मागे असलेल्या मोकळ्या जागेत सहज करू शकता. यामुळे तुम्हाला काही देशी कोंबडीच्या जाती निवडाव्या लागतील. जेणेकरून तुमचे उत्पन्न वाढेल. देशी कोंबड्या किडे, हिरवा चारा, घरी सोललेली फळे आणि भाजीपाल्याची साले, तणांमधील धान्ये खाऊन जगू शकतात. परंतु जर तुम्हाला त्यांच्याकडून चांगले उत्पादन हवे असेल तर या कोंबड्यांना काही अतिरिक्त खाद्य द्यावे लागेल. ज्यामध्ये बाजरी, मका, तांदूळ याचा समावेश असतो.



घरामागील कुक्कुटपालन कसे सुरू करावे?

घरामागील कुक्कुटपालन करण्यासाठी तुम्हाला थोडी जागा हवी आहे. येथे तुम्ही २० ते २५ कोंबड्या पाळाव्यात. प्रामुख्याने स्थानिक जातीच्या कोंबड्या पाळाव्यात. कारण त्यांच्या अंड्यांना बाजारात विशेष मागणी आहे. देशी जातीच्या कोंबड्या महागड्या विकल्या जातात, त्यांचा दर निश्चित नाही, उलट खरेदीदार आणि विक्रेते आपापसात त्यांचे दर ठरवतात. परसातील कुक्कुटपालनात खाद्यावर फारसा खर्च होत नाही. स्थानिक जातीचे कोंबडे आणि कोंबड्या सकाळपासून संध्याकाळपर्यंत खाद्य शोधत असतात.

परसातील कुक्कुटपालनासाठी चांगली जात

परसातील कुक्कुटपालनातील सर्वात कठीण काम म्हणजे चांगल्या जाती निवडणे. फक्त चांगल्या जातीच्या कोंबड्या तुमचा नफा वाढवू शकतात. त्यामुळे घरामागील कुक्कुटपालन सुरू करण्यापूर्वी कोंबड्या आणि कोंबड्यांच्या सुधारित जातींची माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. घरामागील कुक्कुटपालनासाठी तुम्ही देशी कोंबड्या, कडकनाथ, स्वरनाथ, ग्रामप्रिया, केरी श्यामा, निर्भिक, श्रीनिधी, वनराजा, कारी उज्ज्वल आणि कारी इत्यादी जातींच्या कोंबड्या पाळू शकता.

परसातील कुक्कुटपालनातून मोठा नफा

परसातील कुक्कुटपालनात येणाऱ्या कोंबड्या तयार होण्यास जास्त वेळ लागत नाही. स्थानिक जातीच्या कोंबड्या ७ ते ८ महिन्यांत तयार होतात, तर सुधारित जातीच्या कोंबड्यांचे वजन ४ ते ५ महिन्यांत सुमारे एक ते दीड किलोपर्यंत पोहोचते. जर तुम्ही मोठ्या संख्येने कोंबड्या पाळल्या तर त्यांच्याकडून तुम्हाला दरवर्षी लाखोंचा नफा मिळू शकतो. याशिवाय देशी जातीच्या कोंबड्यांच्या मांसाला बाजारात जास्त मागणी आहे, त्यांचे मांस येथे विकूनही तुम्ही चांगला नफा कमवू शकता.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९४८ : ओरिसा उच्च न्यायालयाची स्थापना
१९७३ : मार्टिन कूपर या मोटोरोला कंपनीतील संशोधकाने जगातील पहिला मोबाईल टेलिफोन कॉल बेल लॅब्जमधील डॉ. जोएल अँगेल याला केला.
१९७५ : बॉबी फिशरने अनातोली कार्पोव्ह विरुद्ध खेळण्यास नकार दिल्यामुळे अनातोली कार्पोव हा बुद्धिबळात जगज्जेता बनला.
१९८४ : भारताचा पहिला अवकाशयात्री राकेश वर्मा याची दोन रशियन अंतराळवीरांसह अंतराळप्रवासाला सुरुवात
२००० : आय. एन. एस. आदित्य हे नौकांना इंधन पुरवणारे संपूर्ण भारतीय बनावटीचे वेगवान जहाज नौदलाच्या ताफ्यात दाखल झाले.
२०१० : ॲपल कंपनी ने आयपॅड या टॅब्लेट संगणकाची पहिली आवृत्ती जाहीर केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८१ : स्वामीनारायण, भारतीय धर्मगुरू.
१८८२ : प्रसिध्द कादंबरीकार नाथमाधव.
१८८२ : द्वारकानाथ माधव पितळे उर्फ 'नाथमाधव' सामाजिक व ऐतिहासिक कादंबरीकार. त्यांच्या 'वीरधवल', 'रायक्लब' अथवा सोनेरी टोळी' या कादंबर्यांनी वाचकांना अक्षरश: वेड लावले होते. (मृत्यू: २१ जून १९२८)
१९०३ : कमलादेवी चट्टोपाध्याय मॅगसेसे पुरस्कार विजेत्या (१९६६) स्वातंत्र्यसैनिक व सामाजिक कार्यकर्त्या (मृत्यू: २९ आक्टोबर १९८८)
१९०४ : रामनाथ गोएंका 'इन्डियन एक्सप्रेस' वृत्तपत्रसमुहाचे संस्थापक, स्वातंत्र्य चळवळीतील नेते (मृत्यू: ५ आक्टोबर १९९१)
१९१४ : भारताचे पहिले फील्डमार्शल जनरल माणकेशा.
१९३० : जर्मन चॅन्सेलर हेल्मुट कोल्ह
१९१४ : फील्ड मार्शल सॅम माणेकशा (मृत्यू: २७ जून २००८)
१९३४ : जेन गुडॉल इंग्लिश प्राणिशास्त्रज्ञ
१९६२ : जयाप्रदा चित्रपट अभिनेत्री व संसद सदस्य
१९६५ : नाझिया हसन पाकिस्तानी पॉप गायिका (मृत्यू: १३ ऑगस्ट २०००)
१९७३ : भारतीय क्रिकेट खेळाडू निलेश कुलकर्णी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६८० : छत्रपती शिवाजी राजे भोसले (जन्म: १९ फेब्रुवारी १६३०)
१८९१ : एडवर्ड लूकास फ्रेन्च गणिती (जन्म: ४ एप्रिल १८४२)
१९८१ : पॅन अमेरिकन वर्ल्ड एरलाईन्स चे स्थापक जुआन त्रिप्प यांचे निधन.(जन्म: २७ जून १८९९)
१९८५ : डॉ. वासुदेव विष्णू मिराशी महामहोपाध्याय, संस्कृत विद्वान, प्राच्यविद्यासंशोधक (जन्म: १३ मार्च १८९३)
१९९८ : हरकिसन मेहता प्रसिद्ध गुजराती कादंबरीकार, 'चित्रलेखा प्रकाशन'चे मुख्य संपादक (जन्म:)
१९९८ : मेरी कार्टराइट इंग्लिश गणितज्ञ (जन्म: १७ डिसेंबर १९००)
२०१२ : भारतीय राजकारणी गोविंद नारायण यांचे निधन. (जन्म: ५ मे १९१६)

## उन्हाळी मुग लागवड तंत्रज्ञान



पेरणी अंतर व हेक्टरी बियाणे : लागवडीसाठी ३० सें.मी. १० सें.मी. अंतर ठेवावे. हेक्टरी १५ ते २० जणांच्या किलो बियाणे वापरावे. बियाण्याला प्रती किलोस २.५ ग्रॅम प्रमाणे प्रथम बुरशीनाशकाची आणि शेवटी पेरणीपूर्वी २५ ग्रॅम रायझोबियम जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी.मूग पिकाला मध्यम ते भारी स्वरूपाची जमीन मानवते. जमिनीची उभी-आडवी नांगरट करून ढेकळे फोडून माती बारीक करावी. फळी मारून जमीन सपाट करावी. योग्य आकाराचे सपाट वाफे करून दोन वाफ्यामध्ये पाण्याचे पाट ठेवावेत. मुगाची लागवड उन्हाळी हंगामात करावी. कमी कालावधीचे पीक असल्याने जानेवारी ते फेब्रुवारीच्या दरम्यान मुगाची पेरणी करावी.

पेरणी अंतर व हेक्टरी बियाणे :

लागवडीसाठी ३० सें.मी. १० सें.मी. अंतर ठेवावे. हेक्टरी १५ ते २० जणांच्या किलो बियाणे वापरावे. बियाण्याला प्रती किलोस २.५ ग्रॅम प्रमाणे प्रथम बुरशीनाशकाची आणि शेवटी पेरणीपूर्वी २५ ग्रॅम रायझोबियम जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी.

खते : हेक्टरी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद पेरणीपूर्वी सरीमध्ये बियाण्याखाली देऊन मातीमध्ये करावी. मिसळून घ्यावे व त्यानंतर पेरणी करावी.

पाणी व्यवस्थापन: या पिकाला १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाच पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. काची फांद्या फुटण्याची वेळ, पीक फुलोऱ्यात असताना आणि शेंगामध्ये दाणे भरण्याच्या काळात पाण्याचा ताण बसणार नाही याची काळजी घ्यावी.

आंतरमशागत : पिकाची उगवण झाल्यानंतर १० दिवसांनी नांगे भरावेत आणि आवश्यकतेनुसार पिकाची बारून विरळणी करून घ्यावी. साधारणपणे १५ ते १८ दिवसांनी करून कोळपणी करावी. तसेच ४० दिवसांनी बेणणी करावी.

पीक संरक्षण : पाने खाणारी अळी, तुडतुडे व मावा या किडींपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी गरजेनुसार ६०० मि.ली. प्रवाही मोनोक्रोटोफॉस ५०० लि. पाण्यात सरी मिसळून एक हेक्टर क्षेत्रावर फवारा द्यावा. करपा रोगांचा १५ प्रादुर्भाव आढळल्यास एक लीटर पाण्यात २.५ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराईड या प्रमाणात मिसळून फवारणी करावी कापणी : शेंगा पक्व झाल्यानंतर म्हणजेच पेरणीनंतर साधारणतः ६० ते ७० दिवसांनी या पिकाच्या शेंगांची तोडणी करावी. शेंगांचा हिरवा रंग बदलून तो पिवळसर तपकिरी होऊ लागतो. त्यावेळी शेंगा तोडणीस तयार होतात. उशिरा वा कडक उन्हात तोडणी करू नये अन्यथा शेंगा तडकून उत्पन्नात घट होते. शेंगांची तोडणी शक्यतो सकाळी करावी म्हणजे शेंगा तडकत नाहीत. पक्व शेंगाची मोडणी दोन ते तीन वेळा करावी. त्यानंतर शेंगा उन्हामध्ये २ ते ३ दिवस सुकविल्यानंतर काठीच्या साहाय्याने दाणे वेगळे करावेत व स्वच्छ करावेत

# टोमॅटोनं बदललं शेतकऱ्याचं जीवन, कमी खर्चात मिळवलं लाखो रुपयांचं उत्पन्न

अलिकडच्या काळात अनेक शेतकरी आपल्या शेतात वेगवेगळे प्रयोग करताना दिसत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शेतकरी कमी क्षेत्रात भरघोस, उत्पादन घेत आहेत. एका अशाच उत्तर प्रदेशमधील एका शेतकऱ्याने टोमॅटोच्या शेतीतून मोठं उत्पन्न मिळवलं आहे. बबलू कुमार असं या शेतकऱ्याचं नाव असून, ते रायबरेलीच्या चिटवानिया गावातील रहिवासी आहेत. पाहुयात त्यांची यशोगाथा.

बबलू यांनी पारंपारिक शेती करण्यापेक्षा वेगळी शेती करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी आपल्या शेतात टोमॅटोची लागवड केली. यातून त्यांना चांगला नफा मिळत आहे. इतर पिकांच्या तुलनेत टोमॅटो पिकाला खर्चही कमी येतो, त्यामुळं टोमॅटो पिकाची शेती परवडत असल्याची माहिती बबलू यांनी दिली. खर्च जाऊन बबलू यांना १ एकर टोमॅटोच्या पिकातून ३ ते ४ लाख रुपयांचा नफा निव्वळ नफा झाल्याची माहिती दिली.

टोमॅटो पिकाच्या लागवडीसाठी कमी खर्च

इतर पिकांच्या तुलनेत टोमॅटो पिकाच्या लागवडीसाठी कमी खर्च येतो. त्यामुळं गेल्या पाच वर्षापासून मी टोमॅटोची लागवड करत असल्याची माहिती शेतकरी बबलू कुमार यांनी दिली. कमी खर्च आणि कमी काळात टोमॅटो विक्रीसाठी बाजारात नेता येतं. त्यामुळं कमी



कालावधीत पैसे मिळतात. सध्या बाजारात टोमॅटोला मोठी मागणी देखील आहे. याचा आम्हाला चांगला फायदा होत असल्याची माहिती बबलू कुमार यांनी दिली.

एका कॅरेटची किंमत ही ६०० ते ७०० रुपये

बबलू कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या टोमॅटोच्या एका कॅरेटची किंमत ही ६०० ते ७०० रुपये आहे. एका कॅरेटमध्ये २५ ते ३० किलो टोमॅटो बसतात. त्यामुळं शेतकऱ्यांना या दराचा फायदा होत आहे. वालुकामय माती टोमॅटोच्या लागवडीसाठी योग्य समजली जाते. तसेच काळी , तांबडी माती देखील लागवडीसाठी योग्य मानली जाते. फक्त ही जमिन पाण्याचा निचरा होणारी हवी आहे.

मागील वर्षी टोमॅटोच्या किंमतीनं मोडला होता विक्रम

मागील वर्षी जुन जुलै महिन्यात टोमॅटोच्या किंमतीनं विक्रम केला होता. प्रतिकिलो टोमॅटोचे दर हे २०० रुपयांच्या आसपास गेले होते. यावेळी ज्या शेतकऱ्यांकडे टोमॅटो होती, त्या शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला होता. मात्र, यावेळी देखील किंमती नियंत्रीत करण्यासाठी सरकारनं एक धोरणं आखलं. सरकारनं देशातील टोमॅटोच्या किंमती कमी करण्यासाठी नेपाळवरुन टोमॅटोची आयात केली. परिणामी देशातील टोमॅटोच्या किंमती घसरल्या होत्या. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला होता. आता पुन्हा टोमॅटोच्या किंमती वाढत असल्याचे दिसत आहे.

cmyk



# आ.लक्ष्मण पवार व शिवराज पवार यांच्या वतीने इफ्तार पार्टी उत्साहात





गेवराई । प्रतिनिधी

मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरू झाला असून सालाबादा प्रमाणे याही वर्षी गेवराई येथील रोजगार मुस्लिम बांधवाकरीता आज रविवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज शॉपींग सेंटर येथे गेवराईचे आ.लक्ष्मण पवार पवार व शिवराज पवार पाटील परिवाराकडुन रोजा इफ्तारीचे आयोजन करण्यात करण्यात आले होते यावेळी सुशील जंवजाळ, राजेंद्र राक्षसभुवनकर, पत्रकार मधुकर तौर, आय्युब बागवान,अकुश आतकरे, भागवत जाधव, विनोद नरसाळे, अमोल कापसे, अनिल आगुडे,शेख ईर्शाद, शेख उस्मान, दादासाहेब गिरी,याहीया खॉन, सतिष दाभाडे, माणिकसेट बागवान, मुन्नाभाई,आप्पासाहेब कानगुडे, राम पवार,संजय इगळे,विठ्ठल मोटे,आरूण मस्के, जमील पठाण,आब्दुलभाई,मतीन कुरेशी, बाबुभाई फिटर, निजामभाई, सालम चाऊस, हामीद बागवान, गफ्फार भाई, विष्णुपंत आतकरे, खदीर बागवान, लक्ष्मण चव्हाण, शेख रईस, युसुफ भाई, शेख नसीर, जगन पवार, बबन जाधव,इम्रान पठाण, शौकत पठाण, प्रकाश गायकवाड,प्रकाश उपळकर, प्रल्हाद येळापुरे, संजय आधंळे, शकर संभाहारे, उस्मान शेख, शेख शब्बीर,आदी उपस्थित होते

रमजान महिन्यांच्या पाश्वभूमीवर रोजगार मुस्लिम बांधवासाठी विविध समाजातील नागरिकांकडून रोजाइफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येत असून यावेळी सर्व जाती धर्मातील नागरिकाचा सहभाग घेऊन देशातील बंधुभाव जोपासत गेली अनेक वर्षांपासून गेवराईत मुस्लिम समाजातील पवित्र महिन्यांत रोजगार बांधवासाठी विविध जाती धर्माच्या वतिने रोजा इफ्तारीचे आयोजन करण्यात येते यावेळेस सर्व जाती धर्मातील नागरीक एकत्र येऊन रोजा इफ्तारी करून आपला उपवास सोडतात.



## विहिर कठड्याच्या चालू कामात ट्रॅक्टर विहिरीत पडल्याने चालकाचा मृत्यू

दिंद्रुड । प्रतिनिधी

विहिरीच्या कठड्याच्या चालू कामात ट्रॅक्टर विहिरीत पडून ट्रॅक्टर चालकाचा मृत्यू झाल्याची घटना नित्रुड (ता.माजलगाव) जवळील एका तांड्याजवळील शेतात रविवारी (दि३१) सायंकाळी चार वाजता च्या सुमारास घडली.

दिंद्रुड पोलीस हद्दीतील नित्रुड परिसरातील मास्तर तांडा नजीक शेतात नवीन विहीर खोदकाम झालेले आहे. सदर विहिरीच्या कठड्याच्या साईड ट्रॅक्टरच्या साहाय्याने मातीने भरून लेव्हलिंग करत असताना, ट्रॅक्टर चालकाकडून अनावधानाने ट्रॅक्टर विहिरीत घसरले. या घटनेत ट्रॅक्टर चालकाचा मृत्यू झाला असून भाऊसाहेब राठोड (वय ३० वर्ष) (रा. बदुनायक तांडा) असे चालकाचे नाव आहे. दिंद्रुड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून प्रेतास उत्तरीय तपासणीसाठी माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब खरात, हेड कॉन्स्टेबल अनिल भालेराव, पोलीस नाईक बालाजी सूरेवाड अधिक तपास करत आहेत.

## रामबाग शाळेच्या परिसरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

वडवणी । प्रतिनिधी

दिनांक २/ ४/ २०२४ वार मंगळवार रोजी वडवणी शहरातील चौंडेश्वरी मंगल कार्यालयात जिल्हा परिषद रामबाग शाळा भरत असुन विध्यार्थी ना शाळेत येत असताना किमान ५ ते ६ विध्यार्थी ना व अशोक भंडारे या नागरिकांना मोकाट कुत्र्यांकडुन चावा घेण्यात आला आहे. .अक्षराशा उजवा हाताना भंयकर चावा घेऊन जखमी केले आहे .या मुळे विध्यार्थी मध्ये भितीचे वातावरण पसरले आहे त्यामुळे मुले शाळेत येण्याची संख्या कमी झाली आहे. तरी वडवणी शहरातील चौंडेश्वरी मंगल कार्यालय



व राम मंदीर परिसातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात यावा. असे लेखी निवेदन नगरपंचायत कार्यालय वडवणी येथे नगरपंचायत चे नगर उपाध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे व प्रसाकीय अधिकारी रामेश्वर शिंदे यांना शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने निवेदन देण्यात आले.यावेळी नगरसेवक नागेशभाऊ डिगे,माजी नगरसेवक शिवाजी तात्या टकले, अध्यक्ष विष्णू भाऊ टकले, मुख्याध्यापक कांगणे सर, ग्राहक पंचायत महाराष्ट्र वडवणी तालुका अध्यक्ष शंकर झाडे,दत्ता फासे,अमोल म्हेत्रे, बालाजी टकले,वल्लभ वाव्हाळ,केशव टकले, सोमनाथ झाडे, भैया टिपरे उपस्थित होते.

## रोहयो मजुरांना किमान ७०० ते १००० रुपये रोज द्यावा–भाई विष्णुपंत घोलप

पाटोदा । प्रतिनिधी

केंद्र सरकारने २७/०३/२०२४ रोजी अधिसुचना जारी करुन रोहयो वरील मजुरीत ०४ ते १० टक्के वाढ घोषित करुन ०१ एप्रिल २०२४ पासून त्याची अंमलबजावणी होणार आहे. महाराष्ट्रात रोहयो मजुरांना २७३/– रुपयावरुन २९३/– रुपये मजुरी देण्यात येणार आहे. परंतु मजुरांना वर्षातुन किमान २०० दिवस हाताला काम आणि ७०० ते १००० रुपये किमान मजुरी देण्यात यावी,जेणे करुन समाजातील आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होईल.

जो पर्यंत रोहयो वरील मजुरी वाढणार नाही तो पर्यंत शेतकऱ्यांच्या पिकाचा उत्पादन खर्चावरील हमीभाव



योग्य मिळणार नाही. केंद्र आणि राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या किमान आणि कमाल वेतनाचा विचार केल्यास १००० ते १०००० हजार रुपये रोज एक दिवसाला वेतन रुपाने मिळत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवर काम करणारा कामगार माती, मुरुम, दगडाशी संघर्ष करत असतो त्याला ऊन, वारा, पावसाचा विचार करता त्याचा खुप मोठा संघर्ष आहे. त्याला दिवसभर काम करतांना घाम गाळावा लागतो त्याला सरकार अकुशल मजुर म्हणत आहे. सध्या आईतखाऊला साहेब आणि कष्टकरणाऱ्यांना सध्याच्या व्यवस्थेमध्ये गाढव समजले जात आहे. शासनाचा शेवटच्या श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या बरोबरीत तरी रोहयो वरील मजुरांना मजुरी मिळाली पाहिजे. त्यासाठी मजुरांना वर्षातुन किमान २०० दिवस हाताला काम आणि ७०० ते १००० रुपये किमान मजुरी देण्यात यावी जेणे करुन समाजातील आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होईल. जो पर्यंत रोहयो वरील मजुरी वाढणार नाही तो पर्यंत शेतकऱ्यांच्या पिकाचा उत्पादन खर्चावरील हमीभाव योग्य मिळणार नाही. त्या साठी केंद्र सरकारने आर्थिक समानता करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी वरील मजुरी तात्काळ वाढवावी नसता आर्थिक विषमतेची दरी खुप मोठी होईल ती देशाच्या अस्थिरतेला कारणीभुत ठरेल याची काळजी घ्यावी असे लेखी निवेदन शेकापचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांच्या मार्फत केंद्रीय ग्रामविकास व पंचायत राजमंत्री गिरीराज सिंह यांना पाठविले आहे. माहितीस्तव राज्याचे रोहयो मंत्री संदीपानजी भुमरे, मा.जिल्हाधिकारी,बीड तसेच शेकापचे सरचिटणीस मा.आ.भाई जयंत पाटील यांनी दिले आहे.

## शिंदी येथील विहिरित सापडले विवाहितेचे प्रेत

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील शिंदी येथील शिवारातील सजगणी नावाच्या शेतातील विहीरीत २२, वर्षीय विवाहितेचे प्रेत सोमवारी सायंकाळी साडे चार वाजण्याच्या दरम्यान आढळुन आले असुन पोलीस पाटील राजेंद्र कांबळे यांच्या खबरीवरुन केज पोलीसात आकस्मिक मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

हा आत्महत्ये चा प्रकार आहे की घातपाताचा प्रकार आहे याचा पोलीस तपास घेत आहेत वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील वैष्णवीचे तीन वर्षापुर्वी शिंदी येथील सिद्धेश्वर जाधव याचेशी लग्न झाले होते वैष्णवीला सध्या १५ महीन्याचा मुलगा असुन सोमवारी वैष्णवीच्या चुलत बहीणीचे लग्न असताना ही वैष्णवीला या लग्नाला सासरच्या मंडळी ने जाऊ दिले नसल्याची चर्चा आहे. दरम्यान साडे चार वाजण्याच्या दरम्यान शिंदी येथील सजगणी नावाच्या शेतातील विहीरीत वैष्णवी सिद्धेश्वर जाधव वय २२ वर्षे या विवाहीतेचे प्रेत आढळुन आल्याची खबर पोलीस पाटील राजेंद्र सोपान कांबळे यांनी केज पोलीसांना दिली.जमादार राजु वाघमारे,प्रकाश मस्के यांनी घटनास्थळी जाऊन पार्थिव विहीरीच्या बाहेर काढुन उत्तरीय तपासणी साठी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. बालासाहेब सावंत यांनी उत्तरीय तपासणी केल्या नंतर रात्री उशीरा वैष्णवी जाधव यांचे पार्थीवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.या प्रकरणी केज पोलीसात आकस्मिक मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

## पंचायत समितीत सावळा गोंधळ आणि कर्मचाऱ्यांची मनमानी

### पंचायत समिती कार्यालय म्हणजे भ्रष्टाचाराचा अड्डा –भाई गोले

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील अनेक शासकीय कार्यालयापैकी पूर्णता अधिकारी, कर्मचारी यांची मनमानी असणारे एकमेव कार्यालय म्हणजे पंचायत समिती. आणि हेच पंचायत समिती कार्यालय म्हणजे भ्रष्टाचाराचा अड्डा झाला आहे,असे भाई ॲड . नारायण गोले पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की,पंचायत समिती कार्यालयात कोठेही अधिकारी, कर्मचारी यांना काम करण्याच्या कुठल्याही वेळा कार्यालयात नमूद केलेल्या नाहीत त्याबाबत अधिकारी कर्मचाऱ्यावर मेहरबान असून कर्मचारी जी व्यक्ती पैसे देईल त्याचेच काम करून उर्वरित फाईल अस्तव्यस्त टाकून कार्यालयाला वाऱ्यावर सोडून बिनधास्त बाहेर फिरत असतात, याबाबत अधिकारी अनभिज्ञ असल्याचे सोंग करतात आणि सामान्य जनतेच्या तक्रारी बाबत अधिकारी बघतो, करतो माहिती घ्यावी लागेल अशी उत्तरे देऊन वेळ मारून नेतात, पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी व ग्रामसेवक सामान्य नागरिकाचे फोन देखील घेत नाहीत याबाबत गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केल्यास कुठलीही दखल घेतली जात नाही,दिनांक २ एप्रिल मंगळवार रोजी तर कहरच झाला दुपारी ३ वाजून ४४ मिनिटांनी पंचायत समिती कार्यालयात तब्बल कार्यालयातील सहा उपविभाग बंद होती, तर तीन उप विभागात एकही व्यक्ती नसताना कार्यालय उघडयावर आणि वाऱ्यावर सोडलेले दिसत होते.. याबाबत शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी गटविकास अधिकारी यांची भेट घेऊन कार्यालयातील कर्मचाऱ्याची तोंडी तक्रार केली. जर तोंडी तक्रारीवर गटविकास अधिकारी यांनी कार्यालयातील गैरप्रकार, भ्रष्टाचार थांबवला नाही तर शेतकरी कामगार पक्ष आपल्या अनोख्या स्टाईलने आंदोलन करील असा इशारा प्रसिद्धी पत्रकाद्वारे भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी दिला आहे.

## युवा माहेश्वरीच्या अध्यक्षपदी अभिजीत दोडे

बीड । प्रतिनिधी

येथील श्री युवा माहेश्वरी सेवाभावी संस्थेच्याच्या प्रमुख पदाधिकार्यांची बैठक हॉटेल ग्रीन कोर्ट येथे आयोजीत करण्यात आली होती. यामध्ये सर्वानुमते अध्यक्षपदी अभिजीत दोडे व सचिवपदी पवन भक्कड यांची निवड करण्यात आली.

बीड येथील श्री युवा माहेश्वरी सेवाभावी संस्था ही सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असते. विविध सामाजिक उपक्रमांतून एक आदर्श निर्माण केला असून या संस्थेचे ज्येष्ठ सदस्य अमरजी सारडा यांच्या अध्यक्षतेखाली हॉटेल ग्रीन कोर्ट येथे बैठक पार पडली. या बैठकीत अध्यक्षपदी अभिजीत दोडे, सचिवपदी पवन भक्कड, उपाध्यक्ष अनुप चरखा, कोषाध्यक्ष आशिष चरखा, सहसचिव महेश बियाणी, संघटन मंत्री युवराज चरखा यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. संस्थेने आजवर केलेल्या सामाजिक कार्याची परंपरा आपण कायम ठेवणार असल्याचे प्रतिपादन अभिजीत दोडे यांनी यावेळी केले. नुतन पदाधिकार्यांचे समाजातून अभिनंदन केले जात आहे.

## अरे खोप्यामधी खोपा, सुगरणीचा चांगला, पिलासाठी तिने झोका झाडाला टांगला ’

**बीड । प्रतिनिधी**

अरे खोप्यामधी खोपा, सुगरणीचा चांगला, पिलासाठी तिने झोका झाडाला टांगला’ अशा शब्दांत सुगरणीच्या कौशल्याला शब्दबद्ध करणाऱ्या ग्रामीण कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्यामुळे सुगरणीचा खोपा सर्वत्र परिचित झाला.मात्र ग्रामीण भागांत पावलोपावली सर्वत्र दिसणारे सुगरण व इतर पक्ष्यांची घरटी वाढत्या वृक्षतोडीसह विहिरीत लोंबकळणाऱ्या झुडपाचीही तोड झाल्याने पशुपक्षी, सुगरणी अन्यत्र स्थलांतरीत होऊन त्यांच्या खोप्यांना कडुलिंब, बाभुळ, पिंपळ, बदाम, हिवरांच्या झाडांनी आपल्याकडे आकर्षित करून कवेत घेतले.रस्त्याने जातांना झाडां- झाडांवर लोंबकळणारे सुगरणीचे खोपे वाटसरूंना आपल्याकडे आकर्षित करत असल्याचे चित्र ता. केज सह चौफेर पाहवयास मिळते.



प्रत्येक पक्ष्यांना त्यांची अंडी व पिलांची जोपासना करतांना सुरक्षिततेची काळजी असते. त्यामुळे सुगरण पक्षाचे घरटे बोरी, सुबाभळी आदी काटेरी झाडं किंवा जेथे साप, मुंगूस, माणूस, शिकारी पक्षी जाणार नाहीत अशा विहिरीकाठच्या झुकलेल्या झाडांवर ते खोपे तयार करतात. कारण त्यांची अंडी व पिलं खाणारे साप, मुंगूस, शिकारी पक्षी यांच्याबरोबरच घराच्या बेडरूम, ऑफिसची शोभा वाढवण्यासाठी त्यांचे खोपे चोरणाऱ्या माणसांचीही त्यांना भीती असते. गवताच्या काड्या गोळा करून विहिरीकाठी असलेल्या पिंपळ, बाभळ, बोर, काटेरी झुडपं, कडुलिंब आदी विहिरीपेक्षा उंच व विहिरीत झुकलेल्या झाडाच्या फांदयास घरटी बनवण्यासाठी सुगरण पक्षी पहिली पसंती दाखवतो. मात्र मागील अनेक वर्षापासून वृक्षतोड आणि विहिरी, बारवा कमी झाल्याने त्यांनीही बदल स्वीकारला आहे. बेसुमार वृक्षतोड, विहीरीऐव जी घेतल्या जाणाऱ्या कूपनलिका, नदी पात्रातून केली जाणारी पाईपलाईन आदीमुळे सुगरणीच्या पारंपरिक वसाहती सुंकटात सापडल्या आहेत.ते पण काळानुरूप या बदलांशी जुळवून घेत आहे. हे पक्षी आता आपली घरटे बनविण्यासाठी जागा बदलत आहे. बेसुमार झालेल्या वृक्षतोडीने सुगरणीच्या खोप्याची आता कूसच बदलली आहे. हळुहळू आता काळाच्या ओघात जागोजागी दिसणारे घरटे लुप्त होत आहेत. घरटीसाठी सुरक्षीत वाटणारी विहीरी काठची जागा आता त्यांना अडगळीची व असुरक्षित वाटत आहे. या सुगरणीने बनवलेल्या घरट्यात वरच्या बाजूने प्रवेश असतो. तर सुगरणीच्या खोप्याचे प्रवेशद्वार खालच्या बाजूच्या पोकळीतून असते. त्यांची कलाकुसर पाहुन माणसांला हेवा न वाटावा हे नवलच म्हणावे लागेल. यंदा उंच तर काही बुटक्या झाडाच्या वेगवेगळ्या फांद्यांना सुगरणाने किमान आठ ते दहा घरटे बांधल्याचे दिसुन येते. विहीरीजवळील झाडे,गर्द हिरवाईच्या ठिकाणी सुगरणीची किलबिलाट ऐकावयास मिळतो, अगदी वादळी वारे, अन्? मुसळधार-पावसात सुगरणीची घरटी फांदीला घट्ट बांधलेले असल्याने सुरक्षित राहतात.सुगरणीची घरटे बांधण्याची कला मानवाला अचंबित करणारी आहे.

## हर्षल चोले याची जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य स्थानी असलेल्या महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता:- ५ वी सेमीचा विद्यार्थी चि.हर्षल बाबासाहेब चोले या विद्यार्थ्यांची जवाहर नवोदय विद्यालय गढी या ठिकाणी इयत्ता:- ६ वीच्या प्रवेशासाठी निवड झाली आहे या यशाबद्दल विद्यार्थी,पालक व मार्गदर्शक यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

सविस्तर वृत्तांत असा की,परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालय गढी येथील इयत्ता:- ६ वीच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता:- ५ वी सेमीचा विद्यार्थी चि.हर्षल चोले यांनी ९७.५० % घेऊन वडवणी शहरी विभागात अव्वल स्थान पटकावून प्रवेशासाठी पात्र ठरला आहे या घवघवीत यशाबद्दल विद्यार्थी,पालक व मार्गदर्शकाचे संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक- सचिव,मा.आ.केशवराव आंधळे तसेच वडवणी तालुक्यातील कार्यतत्पर गटशिक्षण अधिकारी बाबासाहेब उजगरे तसेच



विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय भाऊ आंधळे,संस्थेचे संचालक,युवा उद्योजक रंजीत भैय्या धस,संचालक अशोक भैय्या आंधळे तसेच विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक,हिंदी विषयाचे जेष्ठ अध्यापक डोईफोडे सर,श्रीमती शोभाताई आंधळे,जेएनव्ही परीक्षेच्या विभाग प्रमुख श्रीमती नलवाडे मॅडम,सुनीलजी कुलकर्णी सर,विष्णू मंत्रे सर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका यांनी कौतुक करून अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या घवघवीत यशाबद्दल चि.हर्षल चोले यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

cmyk

# नाशिकचे राजकारण पेटले; भुजबळ, गोडसे दोघेही राजधानीत

**मुंबई । प्रतिनिधी**

नाशिक लोकसभेसाठी शिवसेना ठाकरे गटाकडून राजाभाऊ वाजे यांचे नाव जाहीर होऊन त्यांनी प्रचारालाही सुरुवात केली आहे. मात्र, महायुतीकडून आजुनही या जागेचा तिढा सुटलेला नाही. छगन भुजबळ व हेमंत गोडसे यांच्यात ही जागा मिळविण्यासाठी सध्या रस्सीखेच सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. हेमंत गोडसे हे मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी गेलेले असताना त्यापाठोपाठ छगन भुजबळ यांनीही मुंबई गाठल्याचे वृत्त आहे. त्यामुळे नाशिकच्या राजकारणाला नवे वळण आल्याचे दिसते आहे.

महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार गट) व शिवसेना (शिंदे गट) अशा तीनही पक्षांकडून या जागेवर दावा केला जातो आहे. राष्ट्रवादीकडून छगन भुजबळ व शिवसेना शिंदे गटाकडून हेमंत गोडसे या जागेसाठी आग्रही आहेत. मात्र, त्याचवेळी शहरात तीन आमदार व सत्तर नगसेवक भाजपचे असल्याने भाजपही या जागेसाठी प्रयत्नशील आहे. त्यामुळे दोघांच्या भांडणात तिसऱ्याचाच लाभ होतो की काय?



अशीही चर्चा आता मतदारसंघात सुरु झाली आहे. सध्या भुजबळांना नाशिकची उमेदवारी मिळेल अशी चर्चा आहे, मात्र हेमंत गोडसे यांचा मात्र भुजबळांच्या नावाला विरोध आहे. विद्यमान खासदार आमचा असल्याने ही जागा आम्हालाच मिळावी अशी भूमिका गोडसे यांनी घेतली आहे. त्यासाठी ते वारंवार मुख्यमंत्र्यांच्या भेटी घेऊन दबाव निर्माण करु पाहत आहेत.

### गोडसेंनी भुजबळांचा केला होता पराभव

एका बाजूला हेमंत गोडसे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहेत. तर दुसरीकडे छगन भुजबळ हेसुद्धा मुंबईला गेले असल्याने नाशिकच्या उमेदवारीवरून मुंबईत चर्चा होण्याची शक्यता आहे. २०१४ मध्ये छगन भुजबळ यांचा हेमंत गोडसे यांनी याच मतदारसंघात पराभव केला होता. मोदी लाटेचा फटका भुजबळांना बसला होता. यावेळी मराठा समाजाच्या रोषाला भुजबळांना सामोरे जावे लागू शकते.

# कोट्यावधींच्या गाडीत १७ रुपयांची साडी

## आमदार बच्चू कडू यांची राणा दाम्पत्यावर सडकून टीका

**अमरावती । प्रतिनिधी**

राणा दाम्पत्याने मेळघाटमध्ये आदिवासी महिलांना साड्या वाटल्या होत्या. त्यावरून आमदार बच्चू कडू यांनी राणा दाम्पत्यावर सडकून टीका केली आहे. २ कोटींच्या गाडीत फिरायचे आणि १७ रुपयाची साडी गरीबांना वाटायची. आदिवासी महिलांनी नवनीत राणांनी दिलेल्या साड्यांची होळी केली होती. निकृष्ट दर्जाच्या साड्य वाटल्याचा आरोप त्यांनी केला होता. या साडीवाटपावरून मेळघाटमध्ये वातावरण चांगलेच तापले होते त्यावरून आता बच्चू कडूंनी त्यांचा समाचार घेतला आहे.



अमरावतीत लोकसभा निवडणुकीचे वातावरण तापल्याचे दिसत आहे. प्रहारचे उमेदवार दिनेश बुब यांच्या प्रचारार्थ बच्चू कडू यांनी कार्यकर्ता मेळावा घेतला. या मेळाव्यात आमदार बच्चू कडू यांनी राणा दाम्पत्यावर सडकून टीका केली आहे. १७ रुपयांची साडी देऊन मेळघाटची बेइज्जती केली, असे त्यांनी म्हटले आहे. बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाकडे अमरावती लोकसभा मतदारसंघामध्ये दोन विधानसभा मतदारसंघ आहेत. प्रहारने शिवसैनिक दिनेश बूब यांना उमेदवारी देत या ठिकाणी तिरंगी लढत करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. प्रहारचा भाजप उमेदवार नवनीत राणा यांच्या विरोधातील संघर्ष टोकाला जात आहे. भाजपअंतर्गत नवनीत राणांबद्दल तीव्र नापसंती आहे. आता नवनीत राणा यांच्यासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. बच्चू कडूंनी दोन लाखांच्या मतांनी पराभूत करू, वेळप्रसंगी नवनीत राणांचं डिपॉझिट जप्त करू, असा इशारा देखील दिला आहे.

# उमेदवारांनी पोस्टर्स, पॅम्प्लेट छापण्याच्या नियमांचे कडक पालन करावे –जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

१३ मे रोजी ३९ बीड लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या पॅम्प्लेट्स, पोस्टर्स व फ्लेक्स यासह अन्य प्रचार साहित्यांवर मुद्रक आणि प्रकाशकाची नावे आणि पत्ते लिहिले असले पाहिजेत. यासह माध्यम सनियंत्रण प्रमाणिकरण समितीची मंजुरीचा जावक क्रमांक यावर असावा, असे निर्देश जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी दिलेले आहेत.

सोबतच दस्तऐवज मुद्रित केल्यानंतर ठराविक वेळेत, प्रकाशकाच्या ओळखीच्या घोषणेची प्रत असावी. दस्तऐवजाची प्रत मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना पाठवावी लागणार आहे. तरतुदीचे उल्लंघन केल्यास ६ महिन्यांपर्यंतच्या कारावासाची किंवा दंडाची, जी २ हजार रुपयांपर्यंत वाढू शकते अशा



दोन्ही शिक्षेची तरतूद आहे.

मुद्रित माध्यमांमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या बाजूने किंवा विरुद्ध जाहिरात निवडण्याच्या प्रकरणाच्या बाबतीत, निवडणूक काळात, प्रकाशकाचे नाव आणि पत्ता प्रकरण, जाहिरातीसोबत द्यावा, असे निवडणूक आयोगाने निर्देश दिले आहेत. यापूर्वी जिल्हाधिकारी यांनी याबाबत जिल्ह्यातील प्रकाशकांशी यावर चर्चा करून सूचना दिलेल्या आहेत.

याबाबत असलेल्या कायदयाचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. कायद्यातील तरतुदी आणि या संदर्भात आयोगाच्या निर्देशांच्या अंमलबजावणीस जबाबदार असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने त्याच्या कर्तव्याचे योग्य पालन करण्यात कसूर केल्याचे आढळल्यास दंडात्मक कारवाईशिवाय कठोर शिस्तभंगाची कारवाईची तरतूद आहे. मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी याबाबतच्या आदेशातील मजकूर सर्व प्रिंटिंग प्रेसच्या निदर्शनास लिखित स्वरूपात आणून दिला आहे. उमेदवार आणि राजकीय पक्षांनी पोस्टर्स, पॅम्प्लेट आदी छापण्या संबंधी कायद्यातील तरतुदीचे पालन करावे, असे आवाहन करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले आहे.

# खासदार हेमंत पाटील मुंबईत तळ ठोकून; ३०० गाड्यांचा ताफा आला सोबतीला

**हिंगोली । प्रतिनिधी**

हेमंत पाटील यांच्या उमेदवारीला भाजपकडून होत असलेल्या विरोधामुळे उमेदवार बदलाच्या चर्चेला तोंड फुटल्याने शिंदे गटाचे खासदार हेमंत पाटील हे मुंबईत तळ ठोकून आहेत. मंगळवारी सकाळी हिंगोली लोकसभा मतदार संघातील तब्बल ३०० गाड्यांचा ताफा मुंबईकडे रवाना झाला आहे. कोणत्याही परिस्थितीत हेमंत पाटील हेच महायुतीचे उमेदवार राहतील अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. भाजपचा विरोध मावळल्यात जमा असल्याचे बोलले जात आहे.



महायुतीने चार दिवसांपुर्वीच विद्यमान खासदार हेमंत पाटील यांची उमेदवारी जाहीर केली. खासदार पाटील यांनी प्रचारास सुरूवातही केली होती. परंतू भाजपने हिंगोली लोकसभा मतदार संघाची मागणी लावून धरली. हेमंत पाटील यांच्या उमेदवारीला थेट विरोध दर्शवित एकतर उमेदवार बदलावा किंवा लोकसभेची जागा भाजपला सोडावी अशी मागणी सोमवारी नांदेड येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भाजपच्या शिष्टमंडळाने केली. परंतू फडणवीस यांनी हिंगोलीची जागा शिवसेनेचीच असून आपण युतीचा धर्म पाळावा असा सल्ला भाजपच्या शिष्टमंडळाला दिला. त्यामुळे शिष्टमंडळ हिंगोलीला परतले. परंतू उमेदवारी बदलीच्या चर्चेला उत आल्याने कोणताही धोका पत्करण्यास हेमंत पाटील तयार नसल्याने त्यांच्यासह त्यांच्या हजारो समर्थकांनी सोमवारी सकाळी अडीचशे ते तीनशे गाड्यांचा ताफा मुंबईकडे रवाना झाला. यामध्ये प्रामुख्याने कळमनुरीचे तालुकाप्रमुख जयदिप काकडे, वसमतचे तालुकाप्रमुख राजू चापके, हिंगोलीचे शहरप्रमुख अशोक नाईक, तालुकाप्रमुख प्रताप काळे, सेनगावचे तालुकाप्रमुख रामप्रसाद घुगे, उपजिल्हाप्रमुख ब्रम्हानंद नाईक, अमोल खिल्लारी, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख रेखाताई देवकते, रामेश्वर शिंदे, सुशिला आठवले, सारिका चांदणे, मीना गडदे, निर्मला पाटोळे, मच्छिंद्र सोळंके, रामकिसन झुंझूर्डे, प्रभाकर क्षिरसागर, गोविंद नादरे यांच्यासह हिंगोली लोकसभा क्षेत्रातील सर्कलप्रमुख, गणप्रमुख, बुथप्रमुख, शिवदूत आदींचा समावेश आहे. हिंगोलीची जागा जाहीर झाली आहे. त्यामुळे उमेदवार बदलीची शक्यता कमीच असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे भाजपच्या इच्छुकांचाही विरोध मावळल्याचे चित्र आहे. परंतू वरिष्ठ स्तरावर होत असलेल्या वेगळ्या चर्चेच्या पार्श्वभुमीवर हेमंत पाटलांसह त्यांच्या समर्थकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन कार्यकर्त्यांना दिलासा मिळेल. या भावनेतूनच समर्थक मुख्यमंत्र्यांच्या भेटीला गेल्याचे बोलले जात आहे. गुरूवारी हेमंत पाटील हे मोठे शक्तीप्रदर्शन करून उमेदवारी अर्ज भरतील असे स्पष्ट होत आहे.

### ३९ बीड मतदार संघातील मतदान यंत्रांचे प्रथमस्तरीय संगणीकृत सरमिसळ १० एप्रिलला होणार

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अनुषंगाने ३९ बीड मतदार संघातील मतदान यंत्रांचे प्रथमस्तरीय संगणीकृत सरमिसळ (१ ) १० एप्रिलला होणार आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ सुरू झाल्या असून मतदान यंत्राचे प्रथमस्तरीय संगणीकृत सरमिसळ (१ ) करण्यात येत असते ३९ बीड मतदार संघाच्या मतदान यंत्राचे सरमिसळ बुधवार १० एप्रिल रोजी होणार आहे.नियमानुसार यावेळी विविध राजकीय पक्षांचे सदस्य उपस्थित राहून स्वतः ही सरमिसळ पद्धत बघू शकतात .या प्रक्रिया अंतर्गत बॅलेट युनिट ३३१७ कंट्रोल युनिट ३५६९ व्हीव्हीपॅट मशीनची संगणीकृत पद्धतीने (पान २ वर)

# जळगाव जिल्ह्यात राजकीय भूकंप!

## दोन बडे नेते कमळाची साथ सोडून मशाल हाती घेणार

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्यात मोठा राजकीय भूकंप होणार आहे. भाजपाचे खासदार उन्मेश पाटील व करण पवार हे कमळाची साथ सोडून हाती मशाल घेणार आहेत. यास संपर्कप्रमुख संजय सावंत यांनी होकार दिला असून बुधवारी (दि.३) रोजी दोघांचाही शिवसेनेच्या ठाकरे गटात पक्षप्रवेश होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जळगाव लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार उन्मेष पाटील यांचे



तिकीट कापून स्मिता वाघ यांना तिकीट देण्यात आले आहे. भाजपमधील अंतर्गत संघर्षातून उन्मेष पाटील यांना डावलण्यात आल्याची चर्चा आहे. खुद्द उन्मेष पाटील यांनी आपल्याला पक्षाचा निर्णय मान्य असल्याचे जाहीर केले असले तरी ते जाहीर उमेदवाराच्या प्रचारात सहभागी झालेले नाहीत. यात करण पवार यांचीही एंट्री झाली. त्यांनी शिवसेना–उबाठाच्या ज्येष्ठ नेत्यांची भेट देखील घेतली. दरम्यान, कालपासून राजकीय घडामोडी गतीमान झाल्या असून उन्मेष पाटील व करण पवार हे आपल्या समर्थकांसह मुंबईत डेरा टाकून बसलेले आहेत. दरम्यान उन्मेष पाटील यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या भेटही घेतल्याची माहिती आहे. उद्या त्यांचा शिवसेना–उबाठा पक्षात प्रवेश होणार आहे. यानंतर जळगावसाठी करण पवार हे उमेदवार असणार आहे. याबाबत जिल्हा संपर्कप्रमुख संजय सावंत यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी या गोष्टीला दुजोरा दिला आहे. गेल्या दहा–बारा दिवसांपासून याबाबत चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. दि.३ रोजी विद्यमान खासदार उन्मेश पाटील व त्यांचे जिवलग मित्र करण पवार यांचा पक्ष प्रवेश होणार आहे. करण पवार हे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जळगाव लोकसभेचे उमेदवार आहेत.




**बीड : मंगळवारी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली नॅशनल इन्फॉर्मेशन सेंटर (एन आय सी) या कार्यलयामध्ये ३९ बीड लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बैठक घेण्यात आली. यावेळी निवडणुकीच्या काळात वेब कास्टिंग आणि लाईव्ह टेलिकास्ट संदर्भातील यंत्रणा सुसज्ज असावी अशा सूचना यावेळी जिल्हाधिकारी यांनी दिल्या.**

# उमेदवार बदलण्यासाठी भाजपाचा शिंदेंवर दबाव

## तीन ठिकाणी उमेदवार बदलण्याची नामुष्की

**मुंबई । प्रतिनिधी**

महायुतीमधील जागावाटपाचा तिढा सुटण्याच्या अंतिम टप्प्यावर असल्याचे सांगितले जात असतानाच आता महायुतीसमोर उमेदवार बदलावा लागण्याचे नवीन आव्हान उभे राहिल्याची चर्चा आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या गटाने जाहीर केलेल्या ९ जागांपैकी २ जागांवरील उमेदवार बदलला जाईल अशी जोरदार चर्चा आहे. विशेष म्हणजे यासंदर्भातील माहिती शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनीच दिली आहे. संजय शिरसाट यांनी एखादा उमेदवार कमजोर वाटत असल्यास मुख्यमंत्री तो उमेदवार कधीही बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही असे म्हटले होते.



याच पार्श्वभूमीवर हिंगोलीचे उमेदवार हेमंत पाटील यांच्याबरोबरच हातकणंगलेचे उमेदवार धैर्यशील माने यांची उमेदवारी रद्द करून नवे उमेदवार दिले जाण्याची दाट शक्यता आहे. या ठिकाणी दुसरे उमेदवार देण्यासाठी भारतीय जनता पार्टीकडून एकनाथ शिंदेंवर दाबव टाकला जात आहे की काय अशी शंका उपस्थित होऊ लागली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही हिंगोलीमधील उमेदवारासंदर्भात सूचक विधान केल्याचे सांगितले जात आहे. येथील उमेदवार ठरवण्याचा अधिकार हा शिवसेनेचा असून निवडून येणारा उमेदवार सुचवण्याचे काम आपण करू शकतो. प्रत्येकाने महायुतीचा धर्म पाळावा, असे निर्देश फडणवीस यांनी पदाधिका–यांना दिल्याचे समजते. संजय शिरसाट यांनीही थेट हिंगोली आणि हातकणंगले मतदारसंघाचा उल्लेख करत उमेदवार बदलले जाऊ शकतात असे म्हटले आहे. दिलेला उमेदवार कमजोर असल्यासारखे वाटले तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उमेदवार बदलू शकतात असे शिरसाट म्हणाले. त्यांनी यासंदर्भात बोलतानाच हिंगोली किंवा हातकणंगलेचा अथवा दोन्ही जागांवर हे असं काहीतरी होऊ शकतं असं शिरसाट यांनी स्पष्टपणे थेट मतदारसंघाचा उल्लेख करत म्हटले. सध्या सुरू असलेल्या चर्चांनुसार हिंगोली आणि हातकणंगलेबरोबरच यवतमाळ–वाशिमचा उमेदवारही बदलला जाण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सांगली लोकसभेवर विश्वजीत कदमांची भूमिका जाहीर

## पदाधिकाऱ्यांना लिहिले नाराजीचे पत्र



**सांगली । प्रतिनिधी**

सांगलीच्या राजकारणाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. मात्र सध्या सांगलीतून एक मोठी बातमी समोर येत आहे. काँग्रेस नेते विश्वजीत कदम यांनी काँग्रेसच्या राज्य पदाधिकाऱ्यांच्या बैठकीवर नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी यासंबंधी पक्षातील पदाधिकाऱ्यांना लिहीलेले एक पत्र सध्या समोर आले आहे.

विश्वजीत कदम यांनी एक पत्र लिहून आपली नाराजी व्यक्त केली आहे. सांगली लोकसभेसाठी तिकीट मिळावे हा त्यांचा अट्टाहास आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी त्यांनी विशाल पाटील यांना उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न सुरु ठेवले आहेत. मात्र महाविकासआघाडीत असलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने चंद्रहार पाटील यांचे नाव जाहीर केल्यानंतर या जागेचा तिढा वाढल्याचे दिसून आले. त्यांनी लिहिलेल्या (पान २ वर)

# काँग्रेसकडून आंध्रप्रदेशात ५ उमेदवार जाहीर

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकांसाठी काँग्रेसने उमेदवारांची आणखी एक यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये, आंध्र प्रदेशातील ५ जागांवरील उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. तर, बिहार, ओडिशा आणि पश्चिम बंगालमधील उमेदवारांचीही घोषणा केली. आंध्र प्रदेशातील कडप्पा लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसने मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डींच्या बहिणीली मैदानात उतरवले आहे. मात्र, राज्यात गत २०१९ च्या निवडणुकीत जगनमोहन रेड्डींच्या काँग्रेसचे पारडे जड राहिले आहे. त्यामध्ये, लोकसभेच्या २२ जागा तर विधानसभेच्या १५१ जागांवर आयएसआर काँग्रेसने विजय मिळवत सत्ता स्थापन केली होती.

काँग्रेसकडून आंध्र प्रदेशमधील ५ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली असून मुख्यमंत्र्यांच्या बहिणीलाही मैदानात उतरवले आहे. आंध्रप्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा वायएस. शर्मिला रेड्डी यांना कडप्पा लोकसभा मतदारसंघातून



उमेदवारी देण्यात आली आहे. शर्मिला या मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या बहिण आहेत. तर, माजी केंद्रीयमंत्री एम.एम. पल्लम राजू यांना काकीनाडा लोकसभा मतदारसंघातून तिकीट देण्यात आले आहे. कुरुनूल येथून रामुल्लया यादव, बापटला येथून जेडी सलीम व राजामुंदरी येथून रुद्र राजू यांना तिकीट दिले आहे. आंध्र प्रदेशात १३ मे रोजी चौथ्या टप्पात मतदान होणार आहे. येथील २५ जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान होत असून ४ जून रोजी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचा निकाल जाहीर होणार आहे. राज्यात भाजपा, जनसेवा आणि टीडीपी पक्षाने युती केली असून लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्रितपणे लढणार आहे. येथे टीडीपी हा मोठा भाऊ असून लोकसभेच्या १७ जागा लढवणार आहे. तर, भाजपला लोकसभेच्या ६ जागा देण्यात आल्या असून जनसेना पक्षाला २ जागा मिळाल्या आहेत. यंदा प्रथमच राज्यात तीन पक्ष एकत्र आले असून आयएसआर जगनमोहन रेड्डींच्या वायएसआर काँग्रेसला मोठे आव्हान देण्यात येत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पोलीस विभागाने लोकसभा निवडणूकीत कायदा व सुव्यवस्थेची चोख जबाबदारी बजावावी-पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे





**पुणे । प्रतिनिधी**

निवडणूक प्रक्रियेत कायदा व सुव्यवस्थेची महत्त्वाची जबाबदारी पाहता आगामी लोकसभा निवडणुक कालावधीत पोलीस विभागाने आपली भूमिका चोख बजावावी, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी केले.

मावळ लोकसभा मतदारसंघांतर्गत पिंपरी विधानसभा मतदानसंघाच्यावतीने निगडी येथील पोलीस मुख्यालयाच्या कार्यालयात आयोजित केलेल्या मतदार जनजागृती कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री. चौबे बोलत होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त संदीप डोईफोडे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव, मतदान नोंदणी अधिकारी विनोद जळक, समन्वय अधिकारी विजय भोजने, मुकेश कोळप, तहसीलदार जयराज देशमुख, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पोलीस दलातील जवान, कर्मचारी उपस्थित होते.

श्री. चौबे म्हणाले, पुणे जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीपअंतर्गत मतदान जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य बजावत असताना त्यांनी मतदानाचा हक्क बजावणेही महत्वाचे आहे. यासाठी येत्या १३ मे रोजी शहरात होणाऱ्या मावळ लोकसभा निवडणुकीत मतदानाच्या दिवशी मतदान करून लोकशाही प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले. श्री. सिंगला म्हणाले, लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे आणि ती व्यवस्थित पार पाडण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. विविध जिल्ह्यातून, ग्रामीण भागातून पिंपरी चिंचवड शहरात कामकाज करण्यासाठी येणाऱ्या आणि शहराबाहेर मतदान असणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर टपाली मतदानाची सोय उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पोलीस जवानांनी मतदानाची शपथ घेतली.

# सिंहगड टेक्निकल इन्स्टिट्यूट येथे निवडणुकीसाठी नियुक्त अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न




**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी खडकवासला विधानसभा मतदारसंघात नियुक्त मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण सिंहगड टेक्निकल इन्स्टिट्यूट येथे आयोजित करण्यात आले.

यावेळी मतदारसंघाच्या प्रशिक्षण कक्षप्रमुख माधुरी माने यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या भूमिका, निवडणुकीच्या दरम्यान येणाऱ्या आव्हानांविषयी माहिती दिली.प्रशिक्षण कक्ष समन्वयक संजय भोर आणि तुषार राणे यांनी ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट, मतदानाच्या दिवशी करावयाचे नियोजन, संपर्क आराखडा, स्वीप उपक्रमाअंतर्गत करण्यात येणारी कार्यवाही, मतदार चिठ्ठीचे वितरण, आदर्श आचार संहितेचे पालन, मतदार यादी अद्ययावतीकरण आदीबाबत माहिती दिली.

# बारामती सहकारी बँकेला ६७ कोटींचा ढोबळ नफा : बँकेचे अध्यक्ष सातव यांची माहिती

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती सहकारी बँकेने ३१ मार्च २०२४ च्या आर्थिक वर्षाअखेरीस ३ हजार ५८४ कोटींचा व्यवसाय केला आहे. ६७.४० कोटी रुपये तरतूद पूर्व ढोबळ नफा बँकेला मिळाला असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष सचिन सातव यांनी दिली.

बँकेला आजवर मिळालेल्या ढोबळ नफ्यामध्ये यंदाचा नफा विक्रमी आहे. सर्व तरतूदी पूर्ण करत बँकेने ५ कोटी ७० लाखांचा निव्वळ नफा प्राप्त केला आहे. बँकेचे नक्त मूल्य १५४




कोटींवर पोहोचले असून बँकेने या आर्थिक वर्षात विक्रमी वसूली करत एनपीए (अनुत्पादक जिंदगी) प्रमाण कमी करण्यात यश प्राप्त केले आहे.

बारामती सहकारी बँकेचे पुणे, सातारा, सोलापूर, नगर, नाशिक व रायगड अशा सहा जिल्ह्यात कार्यक्षेत्र असून ३६ शाखा व एका विस्तारीत कक्षाद्वारे कामकाज केले जात आहे. ई टॅक्स, ई स्टँपिंग, पॅन कार्ड, मोबाईल बँकींग, विमा सेवा, यूपीआय पेमेंट या सुविधांसह आरटीजीएस, एटीएम सुविधा दिल्या जात आहेत. बँकेची स्वतःची संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे. लवकरच बारामती बँकेला रिझर्व्ह बँकेकडून नेट बँकिंगची परवानगी मिळेल, असे सातव यांनी सांगितले. बँकेच्या प्रगतीत उपाध्यक्ष किशोर मेहता यांच्यासह सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक रवींद्र बनकर, मुख्य सर व्यवस्थापक विनोद रावळ, सर व्यवस्थापक सोमेश्वर पवार, विजय जाधव, कर्मचारी व सभासदांचे मोठे सहकार्य असल्याचेही सातव यांनी नमूद केले.


# राज्यात सुमारे २२ हजार बंद्यांनी घेतला ई-मुलाखत सुविधेचा लाभ

**पुणे । प्रतिनिधी**

कारागृह विभागाच्यावतीने 'ई-प्रिझन्स' प्रणालीअंतर्गत भारतीय तसेच विदेशी बंदी यांना कुटुंबीयांशी संवाद साधण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'ई-मुलाखत' सुविधेचा सुमारे २१ हजार ९६३ पुरूष व महिला बंद्यांनी लाभ घेतला आहे.

राज्यात १ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीमध्ये तळोजा मध्यवर्ती कारागृहातील ३ हजार ४७८, ठाणे मध्यवर्ती कारागृह ३ हजार ४३८, नागपूर मध्यवर्ती कारागृह ३ हजार ४२५, मुंबई मध्यवर्ती कारागृह १ हजार ७९७, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह १ हजार ५५९, कल्याण जिल्हा कारागृह १ हजार ४४२, येरवडा मध्यवर्ती कारागृह १ हजार २२८ तसेच राज्यातील इतर कारागृहातील पुरूष व महिला बंद्यांनी ई-मुलाखत सुविधेचा लाभ घेतला आहे.

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा




अमिताभ गुप्ता यांच्या प्रयत्नामुळे सुरु करण्यात आलेल्या या सुविधेअंतर्गत राज्यातील कारागृहात बंद्यासंबंधीचे दैनंदिन कामकाज व बंद्यांना पुरविल्या जाणाऱ्या विविध सुविधांचे व्यवस्थापन करण्यात येते. या सुविधेची माहिती देण्याकरीता राज्यातील सर्व कारागृहांच्या दर्शनी भागात तसेच नातेवाईकांची गर्दी असणाऱ्या ठिकाणी माहिती फलक लावण्यात आलेले आहेत.

कुटुंबीय, नातेवाईक, वकील यांना बंद्यांसोबत मुलाखत घेण्याकरीता 'ई-प्रिझन्स' प्रणालीवर पूर्वनोंदणी करता येत असल्यामुळे नातेवाईकांना इच्छित दिवशी व वेळी बंद्यांची मुलाखत घेता येते. अधिकाधिक बंद्यांच्या नातेवाईकांचा या सुविधेचा लाभ घेण्याकडे कल असून प्रत्यक्ष मुलाखतीसाठी येण्याच्या खर्चात बचत होणार आहे. ई-मुलाखतीस बंद्यांचे नातेवाईकांनी चांगला प्रतिसाद मिळत आहे. दहशतवादी कारवायामधील तसेच पाकिस्तानी बंदी यांना सुरक्षेच्या कारणास्तव या सुविधेचा लाभ नाकारण्यात आला आहे. राज्यातील कारागृहांमध्ये सुमारे ६०० पेक्षा अधिक विदेशी बंदी असून या सुविधेमुळे विदेशी बंद्यांना त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधता येत आहे.

# पुण्यात दहशतवादी संशयित चिनी महिलेची विवाह नोंदणी

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात राहणार्या एका दहशतवादी संशयित चिनी महिलेने पुणे महापालिकेच्या वानवडी क्षेत्रीय कार्यालयाने कागदपत्रे अपूर्ण असतानाही विवाह नोंदणी प्रमाणपत्र दिले असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आता पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या दहशतवाद विरोधी शाखेकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे. मोशीतील रहिवासी एका चिनी महिलेने बिबवेवाडीमधील निवासी पत्ता असलेल्या एका भारतीय व्यक्तीसमवेत विवाह केल्याचे भासविले. त्यानुसार या महिलेने येरवडा येथील ऑनलाइन मॅरेज ब्युरोमार्फत विवाह नोंदणी



प्रमाणपत्रासाठी अर्ज केला. संबंधित महिला एजंट पुण्यातील वानवडी क्षेत्रीय कार्यालयाकडून हे प्रमाणपत्र काढून देण्याची तयारी दर्शविली.

या एजंटने रक्कम निश्चित करून क्षेत्रीय कार्यालयाकडे विवाह नोंदणीसाठी अर्ज केला. मात्र, संबंधित चिनी महिलेकडे कागदपत्रे नव्हती, त्यामुळे संबधित एजंटने प्रमाणपत्र देण्यास असमर्थता दर्शविली. दरम्यान, यासंबंधीची माहिती समजल्यावर या एजंट महिलेच्या भावाने जादा रकमेची मागणी करून प्रमाणपत्र देण्याची तयारी दर्शविली. चिनी महिलेने ते दिल्यानंतर एजंट महिलेच्या भावाने वानवडी क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचार्यांच्या माध्यमातून हे प्रमाणपत्र मिळवून दिले. दरम्यान, ही चिनी महिला दहशतवादी संशयित असून, तिची पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. या चौकशीत तिच्याकडे हे प्रमाणपत्र आढळून आले. त्यानुसार आता पिंपरी-चिंचवडच्या दहशतवादविरोधी शाखेने याबाबत पुणे महापालिकेकडून माहिती मागविली असून, या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे.

# शहीद जवान चौधरींवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

आळंदी : : लडाख येथे बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनमध्ये हवालदार हुद्द्यावर देशसेवेत कार्यरत असताना शहीद झालेले जवान हवालदार दिलीप मारुती चौधरी (वय ४७) यांच्यावर केळगाव (ता. खेड) येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.



लडाख येथे देशसेवेत कार्यरत असताना शनिवारी (दि. ३० मार्च) त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. केळगाव येथील स्मशानभूमीमध्ये सोमवारी (दि. १ एप्रिल) त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे, पोलिस उपनिरीक्षक तुकाराम खडके, पोलिस हवालदार पृथ्वीराज पाटील, पोलिस नाईक जालिंदर जाधव, मंडलाधिकारी राजेंद्र वाघ, ग्रामपंचायत व महसूल विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. मूळचे वाफगाव (ता. खेड) येथील असलेले शहीद हवालदार चौधरी हे २००२ पासून देशसेवेत होते. त्यांनी १८ वर्षे अरुणाचल प्रदेश येथे देशसेवा केली. ७५ दिवसांपूर्वीच ते लडाख येथे सेवा देण्यासाठी रुजू झाले होते. त्यांच्या पश्चात यांच्या आई, पत्नी चित्रा चौधरी व दोन मुली गौरी व नम्रता आहेत. केळगाव येथे त्यांना शेवटचा निरोप देण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

# उन्हाचा फटका पोल्ट्री व्यावसायिकांनाही ; उष्माघाताने कोंबड्यांचा मृत्यू

वाल्हे : : मागील महिन्यांपासून उन्हाची तीव्रता वाढत असून, याचा फटका माणसांप्रमाणे,पशु-पक्षी, प्राण्यांनादेखील बसत आहे. तसेच वाढत्या उन्हामुळे पोल्ट्री व्यावसायिक अडचणीत आले आहेत. वाढत्या उष्णतेमुळे दररोज कोंबड्यांचा मृत्यू होऊ लागला आहे. दरवर्षी उन्हाळ्यात कोंबड्यांची मागणी घटते. त्यामुळे कंपनीकडून पक्ष्यांची उचल वेळेत होत नाही. त्याचा फटकाही पोल्ट्री व्यावसायिकांना बसतो आहे. त्यामुळे सध्या नैसर्गिक संकटासोबतच कंपनीच्या धोरणामुळेही पोल्ट्री व्यावसायिकांचे नुकसान होत आहे.

पुरंदरच्या ग्रामीण भागातील तापमान यंदा जास्त प्रमाणात वाढले आहे. तापमान ४० अंशांच्या जवळपास गेले आहे. याचा परिणाम मानवी जीवनासह पोल्ट्री व्यवसायावर होऊ लागला आहे. उष्माघाताने कोंबड्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत आहे शिवाय अंडी उत्पादनही घटले आहे. कोंबड्याचे वजन वाढत नाही. त्यामुळे वाल्हे व परिसरातील पोल्ट्री व्यावसायिकांची चिंता वाढली आहे.

रोज १० ते १२ कोंबड्यांचा मृत्यू

मागील वर्षी १ हजार पक्षांमागे ६ ते ८ कोंबड्यांचा मृत्यू होत होता. यावर्षी यामध्ये वाढ होऊन दिवसाकाठी



१० ते १२ कोंबड्यांचा मृत्यू होत आहे. यावर्षी वातावरणात मोठा बदल झाला असून, दररोज किमान एक हजार पक्ष्यांमागे १० ते १२ कोंबड्या दररोज मृत्युमुखी पडत असल्याचे व्यावसायिक सत्यवान सूर्यवंशी, विनय पवार यांनी सांगितले. दरम्यान, उन्हापासून कोंबड्यांचे संरक्षण व्हावे यासाठी वाल्हे परिसरातील व्यावसायिकांनी पोल्ट्री फार्मच्या छतावर गवत, उसाचे पाचट तसेच नारळाच्या फांद्या अंथरल्या आहेत. तर पोल्ट्री फार्ममध्ये जागोजागी फोगर, स्प्रिंकलर, पंखे, कुलर आदी उपाययोजना केल्या आहेत. त्यामुळे कोंबड्यांचे मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे.

# सोलापूर, नगर मार्गावरील कोंडी कधी संपणार ? उड्डाणमार्ग संकल्पना कागदावरच..

उरुळी कांचन : पुणे शहराचे दक्षिणद्वार असलेल्या पुणे -सोलापूर व पुणे-नगर राष्ट्रीय महामार्गावरील हवेली तालुक्याच्या हद्दीत वाहतूक कोंडीचा प्रश्न अतिशय तीव्र झाला आहे. गेली ५ हून अधिक वर्षे उलटून हा जटिल प्रश्न सोडविण्यासाठी ठोस उपाययोजना न झाल्याने वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी प्रशासकीय पातळीवर अपयशच येत आहे. वाहतूक कोंडीचा विळखा या मुख्य मार्गांवर पडला आहे. राज्यकर्ते ही समस्या सोडविण्यासाठी चंदननगर ते शिरूर तसेच हडपसरहून उरुळी कांचनपर्यंत (इलिव्हेटेड रोड) उड्डाणमार्ग करण्याची घोषणा करीत आहे. मात्र प्रत्यक्षात कागदापलीकडे ही घोषणा प्रत्यक्षात उतरली नसल्याने लोकप्रतिनिधींच्या पोकळ आश्वासनांनी जनतेचा पुरता भ्रमनिरास झाला आहे.

पुणे शहराच्या लगत प्रचंड शहरीकरण वाढल्याने पुणे शहराला जोडणार्या रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला आहे. या लगतच्या भागातून शहरात जाणार्या प्रवाशांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शहरीकरण वाढताना या भागात बांधकामाला परवानगी देताना, पर्यायी रस्त्यांची व्यवस्था नसताना अधांधुंदीच्या कारभारामुळे मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते कोंढण्यास सुरुवात




झाली आहे. या बेधुंदशाहीचा परिणाम आता या ठिकाणी जनता मोजत असल्याची विदारक परिस्थिती आहे.

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर हडपसर, मांजरी, लोणी काळभोर, उरुळी कांचनपर्यंतचा भाग नेहमीच्या वाहतूक कोंडीने अतिशय त्रस्त झाला आहे. पुणे-नगर राष्ट्रीय महामार्गावर वाघोली, लोणीकंद, पेरणेपासून शिक्रापूरपर्यंतची वाहतूक कोंडी अतिशय जटिल बनली आहे. या भागातून प्रवास करणे म्हणजे वाहनचालकांसाठी एक दिव्य पार करण्यासारखे झाले आहे. या भागातून प्रवास करावा की नाही, अशी अवस्था या ठिकाणी आहे.

पुणे-नगर वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने वाहतूक पोलिस, पर्यायी रस्ते रुंदीकरण तसेच अंतर्गत रस्ते प्रशस्त करण्याचा काही प्रमाणात प्रयत्न केला असला तरी, हा प्रयत्न म्हणजे तात्पुरती मलमपट्टी ठरत आहे. या भागातील वाढत्या नागरीकरणापुढे हे पर्याय तकलादू ठरत असल्याची स्थिती आहे. अशीच परिस्थिती पुणे-सोलापूर महामार्गावरील आहे. या परिसरात मोठ्या गृहप्रकल्पांना परवानगी, अनधिकृतपणे प्लॉटिंग व्यवसायाचा विळखा यामुळे महामार्ग तुंबण्याची परिस्थिती आहे. अशा स्थितीत पुणे-सोलापूर महामार्ग रुंदीकरण सोडाच पण या ठिकाणी लोकप्रतिनिधींनी महामार्ग देखभाल दुरुस्ती करण्यासाठी शिफारस करण्याचीही जागरूकता दाखविलेली नाही.

# दौंडमध्ये भागवत, खरात कोणाचे गणित बिघडवणार? शरद पवारांच्या डावाकडे लक्ष

**दौंड । प्रतिनिधी**

लोकसभेच्या निवडणुकीत बारामतीत सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार या नणंद-भावजय यांचा सामना होत असल्याने ही लढत लक्षवेधी तर होणारच आहे, परंतु अजित पवारांना आव्हान देणारे विजय शिवतारे यांनी अचानक घेतलेला 'यू टर्न' व दौंड मधील ओबीसी नेते महेश भागवत, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे सचिन खरात हे उमेदवार कोणाचे राजकीय गणित बिघडवणार, त्यांचा फटका नेमका कोणाला बसतो व कोणाला फायदा होतो हे येणार्या काळात समजेल. सध्या बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये एरव्ही पवारांना कधीही विरोध न करणारे नेते आता खुलेआमपणे विरोध करू लागले आहेत, याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पवारांच्या घरातूनच याची सुरुवात झाली आहे.

शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे या मागील १० वर्षांपासून खासदार असल्याने मतदारांच्या संपर्कात आहेत. अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या नवख्या उमेदवार असल्या तरी अजित



पवारांच्या नावावर त्या आपल्या प्रचाराची धुरा सांभाळत आहेत. शरद पवार यांनी आपल्या मुलीकरिता आपले सर्व राजकीय डाव पणाला लावले आहेत. शरद पवार हे मुरब्बी राजकारणी असल्याने ऐन वेळेस कोणता डाव टाकतात व विरोधकाला कसे चितपट करू शकतात, याकडे मतदारसंघाचे लक्ष लागलेले आहे. शरद पवारांचा दौंड तालुक्यातील अनेक जुन्या दिग्गज नेत्यांशी चांगला संपर्क आहे तर अजित पवार यांच्याकडून दुखावले गेलेले नेते व कार्यकर्ते हे नक्कीच येणार्या काळात छुप्या पद्धतीने शरद पवार यांचे काम करतील असे दिसते.

मागील १० वर्षांपासून अजित पवारांनी दौंड तालुक्यात फारसे लक्ष घातलेले नाही. काही ठराविक कार्यकर्ते त्यांच्या संपर्कात आहेत. दौंड शहरात व तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार रमेश थोरात व भाजपचे विद्यमान आमदार राहुल कुल यांची सध्यातरी दिलजमाई झाली असली तरी कार्यकर्ते ऐन वेळेस काय करतील हे सांगणे कठीण आहे दौंड भाजपमध्ये दोन गट आहेत, त्यांचे एकमेकांशी फारसे काही जमत नसल्याने दौंड तालुक्यात मत विभाजन होणार हे मात्र निश्चित. भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते ज्यांनी कमळ सोडून इतर कोणत्याही पक्षाला आजपर्यंत मतदान केले नाही असे ५० ते ६० हजार मतदार आहेत, त्यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पवारांना विरोध करणारे कार्यकर्ते व मतदार हे या वेळेस घड्याळाला मतदान करतील का की तुतारीला जवळ करतील हे पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे ही निवडणूक रंगतदार तर होईलच, परंतु पाडापाडीच्या राजकारणात नणंद- भावजयीपैकी एकीला फटका बसू शकतो.